# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०९ मार्च, २०२१ / फाल्गुन १८, १९४२ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(३)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(४)** | **नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७०**

---

## उजळंब ( ता.चाकुर,जि. लातुर) ते रोहिणा या जिल्हामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१) * २३५२१ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजळंब ( ता.चाकुर, जि.लातुर) येथील जिल्हामार्ग क्र. ३३ या मार्गावरील रोहिणा येथील अंबिकादेवी मंदिर, हेर या दरम्यान एकूण १० धोकादायक अपघाती वळणे असून उजळंब ते रोहिणा या मार्गावरील रस्त्यावर कोठेही वळणदर्शक फलक, रस्त्यादरम्यान येणाऱ्या गावांची नांवे दर्शविणारे फलक तसेच रस्त्यात येणारी झाडे-झुडपे न काढल्यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली असून सन २०१४ मध्ये डिजिटल इंडिया अभियानांतर्गत ब्रॉडबँड लाईन

(बीबीएनएल) टाकण्यासाठी रस्त्यालगत खोदलेली नाली अद्यापही बुजविण्यात आली नसल्याचे दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उजळंब ते रोहिणा या मार्गाचे काम मंजूर असून सदर रस्त्यावरील वळण दर्शक फलक, गावांची नावे दर्शविणारे फलक तसेच रस्त्यालगत झाडेझुडपे, रस्त्यावरील खड्डे बुजविणे ही कामे माहे डिसेंबर, २०२० पर्यंत पुर्ण करण्यात येतील असे रोहिणा शाखा अभियंता, सा.बां.उपविभाग, चाकूर यांच्याकडून सांगण्यात येऊनही सदर कामे अद्याप सुरु झाली नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्यावर दोन वळणे असून ती धोकादायक तथा अपघाती नाहीत. तसेच, पोलिस स्थानकाचे अहवालानुसार सदर रस्त्यावर सन २०२० या वर्षात अपघात झाल्याची नोंद नाही. वळणदर्शक फलक, गावांची नावे दर्शविणारे फलक प्रगतीपथावरील मंजूर कामांच्या निविदेत समाविष्ट आहेत. सद्यस्थितीत रस्त्यालगतचे गवत/झुडुपे काढण्यात आली असून डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले आहेत. तसेच, ब्रॉडबँडचे (OFC Line) करिता खोदलेली नाली बुजविण्यात आली आहे. मंजूर प्रगतीपथावरील कामे निधी उपलब्धतेच्या अधिन राहून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आटगाव ते वाडा या मार्गावरील अघई येथील रस्त्याच्या संरक्षक भिंती तुटल्यामुळे जुन्या- जीर्ण पुलाचे लोखंडी कठडे तुटले असल्याबाबत

**(२) * २४६४७ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक महामार्गावरील आटगाव ते वाडा या मार्गावरील अघई येथील रस्त्याच्या संरक्षक भिंती तुटल्यामुळे जुन्या- जीर्ण पुलाचे लोखंडी कठडे तुटले असून सदर रस्ता वाहनांच्या रहदारीसाठी अत्यंत अरुंद असल्याने अपघात होण्याचा धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडा (जि.पालघर) तालुक्याला जोडणारा शहापूरमधील आटगाव-वाडा या रस्त्यावर अनेक वर्षापासून जुना अरुंद पुल असल्याने एकावेळेस एकच वाहन जात असल्याने वाहतूक कोंडी होऊन गाव-वस्त्यांच्या वर्दळीमुळे अशा अरुंद व वळणावळणांच्या या रस्त्याच्याकडेला त्वरित संरक्षक कठडे बांधण्याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने स्थानिक नागरिक व वाहनचालकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून सदर रस्ता पुलाच्या दुतर्फा लोखंडी संरक्षक कठडे व भिंती बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) आटगाव-वाडा या रस्त्यावरील ०/४ हा जुना पूल असून, सदर पुलावरील लोखंडी संरक्षक कठडे (रेलिंग) काही ठिकाणी तुटले आहेत. तथापि, सदर संरक्षक कठडे (रेलिंग) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तात्पुरत्या स्वरुपात दुरुस्त करण्यात आले आहेत.

सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा असून, त्याची देखभाल व दुरुस्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे आहे. सदर रस्त्यावरील मोऱ्या व पुलांची संरचना तपासणी झाली असून, त्यांच्या तपासणी अहवालानुसार दुरुस्तीची निविदा प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून यापूर्वीच सुरु असून

ती पूर्ण झाल्यानंतर दुरुस्तीचे काम तसेच आवश्यकतेनुसार संरक्षक कठडे बांधण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## औरंगाबाद (जि.औरंगाबाद) महानगरपालिकेने बँकेचे कर्ज फेडून देखील तारण ठेवलेल्या मालमत्ता बँकेच्याच ताब्यात असल्याबाबत

**(३) * २४०४० श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) महानगरपालिकेने वीज बिलाची थकबाकी आणि समांतर जलवाहिनीच्या कामासाठी १५ मालमत्ता तारण ठेवून बँकेकडून दोनशे कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना विषाणू संसर्गाच्या प्रादुर्भावामुळे पुकारण्यात आलेल्या लॉकडाउनच्या काळात महानगरपालिकेने बँकेचे कर्ज फेडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने बँकेचे कर्ज फेडून देखील तारण ठेवलेल्या मालमत्ता अद्यापही बँकेच्याच ताब्यात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) औरंगाबाद महानगरपालिकेने वीज बिल व समांतर जलवाहिनीच्या कामाकरीता महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्ता तारण ठेवून आय.डी.बी.आय. बँकेकडून रु.२०० कोटी कर्ज घेतले होते, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) • बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड औरंगाबाद महानगरपालिकेने केली असून तारण ठेवलेल्या मिळकतीवरील बोजा नोंद कमी करण्याबाबत महानगरपालिकेने नगर भूमापन औरंगाबाद तसेच तहसिलदार, औरंगाबाद यांना कळविले होते.

• त्यानुसार बँकेकडे महानगरपालिकेच्या तारण ठेवलेल्या मिळकतीवरील बोजा कमी करण्यात आलेला असल्याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील गोळीबार येथे शिवालिक या विकासकाच्या माध्यमातुन राबविण्यात येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबत

**(४) * २१६७२ श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील गोळीबार येथे शिवालिक या विकासकाच्या माध्यमातून ३ झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पातील लाभार्थींना गत १० वर्षांपासून संक्रमण शिबारामध्ये वास्तव्यास ठेवले असून विकासकाने भाडेकरुंना गत ५ ते ६ वर्षांपासून भाडे दिले नसल्यामुळे हजारो कुटूंबांना रस्त्यावर राहण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून सदर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील बाधीत कुटूंबांना त्वरीत घरे देण्याबाबत व त्यांचे पुर्नवसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) अंशत: खरे आहे.

सदरहू योजनेसाठी प्रथम आशयपत्र दि.०७.०९.२००६ रोजी प्रगती मंडळ व इतर ०८ संस्थेकरीता पारीत करण्यात आलेले होते. तद्नंतर सुधारित आशयपत्र दि.१२.१०.२००७ रोजी प्रगती मंडळ व इतर २२ संस्थेकरीता पारीत करण्यात आलेले होते. तसेच दि.१७.११.२००७ रोजी प्रगती मंडळ व इतर २४ संस्थेकरीता पारित करण्यात आलेले होते.

मे.शिवालिक व्हेंचर्स विकासक यांना क्रमांक : झोपुयो- २००८/प्र.क्र. १८७/झोपसु-१ दि.२९.०८.२००८ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.)

अधिनियम, १९७१ मधील कलम ३K(१) च्या तरतुदीनुसार शासनाने निर्देश निर्गमित केलेले आहे. त्यानुषंगाने प्रगती मंडळ व इतर ४५ संस्थेकरीता दि. २०.०८.२००९ रोजी सुधारित आशयपत्र निर्गमित करण्यात आले होते. तद्नंतर प्रगती मंडळ व इतर ५० संस्थेकरीता दि. ०१.१२.२०१२ रोजी सुधारित आशयपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे आहे.

एकूण ७७८३ झोपडीधारकापैकी ५५७२ झोपडीधारक पात्र आहेत. या झोपडीधारकांपैकी १९४४ झोपडीधारकांचे पुनर्वसन झालेले आहे. पुढील पुनर्वसन बांधकाम रखडलेले आहे.

सन २००७ पासून ते सन २०१२ पर्यंत एकूण ०८ संक्रमण शिबीर मध्ये १४२० संक्रमण सदनिका बांधण्यास मंजुरी दिलेली आहे. तथापि, सद्य:स्थितीत विकासकाने ०६ संक्रमण शिबीरांमध्ये ७१६ संक्रमण शिबीर सदनिका बांधले असून यामध्ये झोपडीधारक वास्तव्यात आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

अनेक झोपडपट्टीधारकांचे भाडे थकीत आहे, ही देखील वस्तुस्थिती आहे. भाडे थकीत असल्याबाबत ४९२ झोपडीधारकांनी अर्ज सादर केले असून माहे नोव्हेंबर, २०२० अखेरपर्यंत सुमारे रु.१२.२२ कोटी भाड्यापोटी प्रलंबित आहेत.

झोपडीधारकांचे भाडे प्रलंबित असल्या कारणास्तव दि.०५.०९.२०१९ रोजी विक्री घटकास बांधकाम स्थगिती आदेश (Stop Work Notice) निर्गमित करण्यात आलेली आहे.

(३) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरीता सुधारित अभिन्यास दि.१४.०६.२०१३ रोजी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर अभिन्यासानुसार विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत एकूण ३२ पुनर्वसन इमारती प्रस्तावित आहेत. यामध्ये एकूण ५७५५ पुनर्वसन सदनिकांचा समावेश आहे. अद्यापपर्यंत २२ पुनर्वसन इमारतींचे आराखडे मंजूर करण्यात आले असून यामध्ये ४२७४ झोपडीधारकांच्या पुनर्वसनाची तरतूद करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत ०७ पुनर्वसन इमारतींचे काम पूर्ण झाले असून त्यांना भोगवटा प्रमाणपत्र जारी केलेले आहे. तसेच ०४ पुनर्वसन इमारतींचे अंशत: काम झाले असून भाग भोगवटा प्रमाणपत्र जारी केले आहे.

पुढील पुनर्वसन बांधकाम रखडलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुंबई, पुणे, मिरा-भाईंदर, जळगाव शहर या महानगरपालिकेमार्फत अद्यापही पथ विक्रेत्यांना "पथ विक्री प्रमाणपत्र" देण्यात आलेले नसल्याबाबत

**(५) * २३८१९ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ नुसार सर्व स्थानिक प्राधिकरणांनी ''पथ विक्रेता समिती'' स्थापन करून पथ विक्रेत्यांचे सर्वेक्षण करून त्यांना ''पथ विक्री प्रमाणपत्र'' देणे हे राज्यातील स्थानिक प्राधिकरणांचे कर्तव्य आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, नास्वी व इतर सामाजिक संस्थांनी वारंवार मागणी करूनही राज्यातील मुंबई, पुणे, मिरा-भाईंदर, जळगाव शहर या महानगरपालिकांमार्फत (मुंबईत पथ विक्रेत्यांचे सर्वेक्षण पूर्ण होऊनही) अद्यापही पथ विक्रेत्यांना ''पथ विक्री प्रमाणपत्र'' देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१४-१५ मध्ये वा त्या दरम्यान अधिनियम लागू होऊनही अद्यापही जळगाव महानगरपालिकेमार्फत ''पथ विक्रेता समितीची'' स्थापना करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पथ विक्रेत्यांना ''पथ विक्री प्रमाणपत्र'' न देण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार उपरोक्त महानगरपालिकांमार्फत पथ विक्रेत्यांना ''पथ विक्री प्रमाणपत्र'' देण्याबाबत तसेच जळगाव महानगरपालिकेमार्फत ''पथ विक्रेता समितीची'' स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) अंशतः खरे आहे.
(३) होय.
(४), (५) व (६) कोविड-१९ च्या नियमानुसार जमावबंदीमुळे पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करणे शक्य झाले नाही. जागेवर पथविक्रेते व्यवसाय करत नव्हते. परिणामी सदर सर्वेक्षण काम करता आले नाही. तथापि, महानगरपालिकांतर्फे

फेरीवाला धोरण राबविण्याचे काम प्रगती पथावर आहे. जळगांव महानगरपालिकामध्ये पथविक्रेता समिती स्थापन करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## म्हाडाच्या ५६ वसाहती आणि १०४ अभिन्यास ५० वर्षापेक्षा अधिक जुन्या असल्याने त्यांच्या पुनर्विकासाच्या धोरणाबाबत

**(६) * २२१६० श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.राहुल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या ५६ वसाहती आणि १०४ अभिन्यास ५० वर्षापेक्षा अधिक जुन्या असल्याने त्यांचा पुनर्विकास करण्यासाठी आवश्यक चटईक्षेत्रफळ धोरणाबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन शासनाने म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करणा-या विकासकाला १ चौ.फुटामागे फक्त ००.६ इतकेच क्षेत्रफळ खुल्या विक्रीसाठी असल्याचे स्पष्ट केले, त्याच वेळी झोपडपट्टी पुनर्विकासासाठी असलेल्या ३३ (१०) नियमावलीतील विकासकाला प्रत्येक १ चौ.फुटामागे १.३ चौरस फुट इतके चटईक्षेत्र खुल्या विक्रीसाठी उपलब्ध होऊन जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी असलेल्या ३३ (७) आणि ३३ (९) म्हणजे समुज पुनर्विकासात प्रत्येक १ चौ.फुटामागे १.२ चौ.फुट चटईक्षेत्रफळ खुल्या विक्रीसाठी मिळणार असल्याने या योजनांसाठी अधिक विकासक पुनर्विकासाच्या कामासाठी पुढे आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाच्या वसाहतीतील जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी नियमावलीतील ३३ (५) मध्ये १ चौ.फुटामागे फक्त ००.६ इतकेच चटई क्षेत्रफळ विक्रीसाठी असल्यामुळे विकासक या विरोधाभासामुळे पुनर्विकासाची कामे घेण्यास उत्सुक नसल्याने म्हाडा उपाध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास नगरविकास विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव यांना पत्र लिहून जुन्या इमारतींसाठी असलेल्या तरतूदी म्हाडा वसाहतींनाही लागू कराव्यात अशी मागणी केली आहे, तसेच या मागणीच्या पुष्ट्यार्थ हीच मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री

महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विकास नियंत्रण नियमावलीत सर्वांना समान चटईक्षेत्रफळ मिळाले पाहिजे व त्याच अनुषंगाने जुन्या इमारतींसह म्हाडा वसाहतींचाही पुनर्विकास व्हावा अशी शासनाची भूमिका असल्याचे मा. गृहनिर्माण मंत्री यांनी स्पष्ट करुन नगरविकास विभागाकडे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला आहे व तद्नुसार अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ (DCPR-२०३४) मधील वि.नि.नि. ३३(५) अन्वये संस्थेस ३.० च.क्षे.नि. नुसार मंजुरी देतांना संस्थेच्या सभासदांना पुनर्वसन क्षेत्र DCPR-२०३४ च्या तरतुदीनुसार अस्तित्वातील चटई क्षेत्रफळ + ३५% इतके किंवा किमान ३५.०० चौ.मी. जे जास्त असेल ते चटई क्षेत्रफळ प्राप्त होते.

सदर उपलब्ध चटई क्षेत्रफळा व्यतिरिक्त अद्याप म्हाडाच्या वसाहतीकरीता चटई क्षेत्राबाबतचा प्रस्ताव सद्य : स्थितीत शासन स्तरावर विचाराधीन नाही.

(२), (३), (४), (५) व (६) मुंबई मंडळाच्या अभिन्यासातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचा पुनर्विकास होण्याकरीता, बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ (DCPR-२०३४) मधील वि.नि.नि. ३३(५) अन्वये संस्थेस ३.० च.क्षे.नि. नुसार मंजुरी देतांना संस्थेच्या सभासदांना पुनर्वसन क्षेत्र DCPR-२०३४ च्या तरतुदीनुसार अस्तित्वातील चटई क्षेत्रफळ + ३५% इतके किंवा किमान ३५.०० चौ.मी. जे जास्त असेल ते चटई क्षेत्रफळ प्राप्त होते.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार ४००० चौ.मी. पर्यंतच्या भूखंडाकरीता ३.०० च.क्षे.नि. नुसार उपलब्ध होणाऱ्या अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रफळामधून मूळ सभासदांचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र वगळून उर्वरित बांधकाम क्षेत्रफळ संस्थेस अधिमुल्याची आकारणी करुन वितरीत करण्यात येते. संस्थेतील मुळ सभासदांना देय असलेले पुनर्वसन क्षेत्र एकूण बांधकाम क्षेत्रफळातून वजा करता उर्वरित बांधकाम क्षेत्र हे संस्था / विकासकांना खुल्या बाजारात विक्री करीता उपलब्ध असते.

शासनाने दि .२०/०८/२०१९ रोजी अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळाकरीता आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्याच्या रकमेमध्ये ५०% सूट दिल्यामुळे म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाकरीता संस्था / विकासक पुढे येत असून, पुनर्विकासाकरीता म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून परवानग्या देण्यात येत आहेत .

-----------------

## गडचिरोली जिल्हयात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत 'सर्वांसाठी घरे' या योजनेची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(७) * २३२४५ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने नागरी भागाकरीता सन २०२२ पर्यंत सर्वांना घरे देण्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्यानुसार पंतप्रधान आवास योजनेंतर्गत 'सर्वांसाठी घरे' ही योजना सुरु केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयात अद्यापपर्यंत १६ हजार ९०८ घरकुल बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले मात्र १६ हजार ५२४ मंजूर घरकुलांपैकी अद्यापपर्यंत केवळ १० हजार ५४२ घरकुलांची बांधकामे पूर्ण करण्यात आली असून मंजूरीच्या प्रमाणात बांधकाम होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकारी व कर्मचारी या योजनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे हजारो लाभार्थी या लाभापासून वंचित आहेत परिणामी लोकांमध्ये नाराजीची भावना निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) होय.

(२) गडचिरोली जिल्हयातील नागरी क्षेत्राकरिता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ४५०१ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने आतापर्यंत २४४६ घरकुले बांधण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिली आहे. त्यापैकी १८५९ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे व १३७ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

(३) प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यासाठी अधिकारी व कर्मचा-यांचे दुर्लक्ष झालेले नाही.

(४) प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने केलेल्या विविध उपाययोजना केल्या असून दि.०३.०८.२०१६ च्या आदेशानुसार मोजणी शुल्कात ५०% सवलत देण्यात आली असून, दि.१९.०९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय जमिन रु.१/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दि.३१.०३.२०१८ च्या आदेशान्वये आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न घटक गटातील लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकेसाठी केवळ पहिल्या दस्ताला रु.१०००/- इतका मुद्रांक शुल्काचा सवलतीचा दर निश्चित करण्यात आला आहे. तसेच राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेस गती देण्याच्या अनुषंगाने दि.११.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक-खाजगी धोरणाची (PPP) राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मिठी नदीचा विकास करुन पर्यटन स्थळ करण्याबाबत

**(८) * २३२२० श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदीच्या संवर्धनाकरिता नदीचे रुंदीकरण, खोली वाढवणे, अतिक्रमण हटविणे व पर्यटन स्थळ करणे यासाठी सन २००५ मध्ये हाती घेतलेल्या मिठी नदी प्रकल्पाचे काम १५ वर्षे उलटूनही अद्‌याप अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ मध्ये महानगरपालिका व एमएमआरडीएने संयुक्तपणे हाती घेतलेल्या या प्रकल्पावर आतापर्यंत १४०० कोटी रुपये खर्च करुनही अद्‌याप प्रकल्पाचे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार सदर प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्रकल्पासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मिठी नदीच्या संवर्धानासाठी दिनांक १९.०८.२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

तद्नंतर दिनांक २९.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, मिठी नदी विकास प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता मिठी नदीची दोन भागांत विभागणी करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयानुसार मिठी नदीचा फिल्टरपाडा, पवई ते सी.एस.टी. पूल, कुर्ला या दरम्यानचा ११ कि.मी. चा विकास करण्याची जबाबदारी दिनांक २९.०७.२०१५ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेवर व मिठी नदीचा सी.एस.टी. पूल, कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यानचा ६ कि.मी. विकास करण्याची जबाबदारी एमएमआरडीएवर सोपविण्यात आली.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या मिठी नदीच्या कुर्ला येथील कुर्ला-कलिना पूल ते सी.एस.टी. पूल दरम्यानचा भाग वगळता उर्वरित नदीचे रुंदीकरण व खोलीकरण जवळपास पूर्ण झाले आहे.

तसेच महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मिठी नदीच्या संरक्षण भिंतीच्या एकूण २१.५८८ कि.मी. लांबीपैकी १६.४९ कि.मी. लांबीच्या संरक्षण भिंतीचे काम पूर्ण करण्यात आले असून, ०.७५ कि.मी. लांबीच्या मिठी नदीच्या कुर्ला-कलिना पूल ते सी.एस.टी. पूल, कुर्ला दरम्यानच्या पूर्व किनाऱ्यावरील संरक्षण भिंतीचे रुंदीकरण व खोलीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ३.३२५ कि.मी. लांबीच्या संरक्षक भिंतीचे काम पॅकेज-२ अंतर्गत करण्यात येणार असून, सदर कामासाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली आहे.

सन २०१९ मध्ये मिठी नदीच्या सी.एस.टी. पूल, कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यानच्या एम.एम.आर.डी.ए. च्या अखत्यारीतील उर्वरित ०.९ कि.मी. व वाकोला नदीच्या २.८ कि.मी. लांबीची संरक्षण भिंत बांधण्याचे काम पॅकेज-३ मध्ये अंतर्भूत केलेले असून, सदर कामांची अंदाजपत्रके व मसुदा निविदा पडताळणीचे काम प्रगतीपथावर आहे.

मिठी नदीच्या विकास कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आजतागायत रु. ६४० कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

मिठी नदी विकास प्रकल्पातील अंतर्भूत उर्वरित कामे नदी किनाऱ्यालगत असलेली अतिक्रमणे, जागेचे हस्तांतर व न्यायप्रविष्ठ कामे यामुळे प्रलंबित आहेत.

तसेच एमएमआरडीए प्राधिकरणाच्या अखत्यारीतील मिठी नदीच्या खोलीकरणाचे काम १००% पूर्ण झाले असून, रुंदीकरणाचे काम ९०% पूर्ण झाले आहे. मिठी नदीच्या विकास कामाच्या टप्पा-१ व टप्पा-२ च्या कामासाठी आतापर्यंत रु. ५३८.४० कोटी इतका खर्च झाला असल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणा (जि.नागपूर) येथील समृध्दी महामार्ग निर्माण कार्यात संबंधित क्षेत्रातील रस्त्यांची दुरवस्था होऊन शेतपिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(९) * २४७२७ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील हिंगणा येथील समृध्दी महामार्ग निर्माण कार्यात हजारो ट्रकची वाहतूक होत असल्याने संबंधित क्षेत्रातील रस्ते खराब होऊन शेतक-यांच्या पिकांचे नुकसान झाल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिक व शेतकरी यांनी मा.लोकप्रतिनिधी यांच्या नेतृत्वात आंदोलन केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

संबंधीत क्षेत्रातील महामार्गाच्या कामासाठी वाहतूक करणाऱ्या ट्रकमुळे काही रस्ते खराब झाल्याचे निर्दशनास आले आहे. तथापी ट्रकच्या वाहतूकीमुळे पिकांचे नुकसान झाल्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांची एकही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत ईपीसी कंत्राटदारामार्फत उपयोगात आणण्यात येणाऱ्या रस्त्यांची संयुक्त पाहणी सा.बां. विभाग व म.रा.र.वि.महामंडळ मर्या. यांचे अधिकारी तसेच ईपीसी कंत्राटदाराच्या प्रतिनिधीसोबत दि. ३०.१२.२०२० रोजी करण्यात आली आहे व त्यानुसार रस्ते दुरुस्ती बाबतची आवश्यक ती कार्यवाही निश्चित करण्यात आली असून संबंधीत ठेकेदारास त्या अनुषंगाने अमंलबजावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार रस्ते दुरुस्तीची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील तापी नदीवर पुलाचे बांधकाम करणेबाबत

**(१०) * २५३३६ श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील चोपडा-खेडीभोकरी ते भोकर-जळगाव रा.मा.क्र.४० हा रस्ता १५ किमी. कमी अंतराने जळगाव जिल्ह्याला जोडणारा रस्ता आहे परंतु सद्य:स्थितीत तापी नदीवर पूल नसल्याने सदर रस्ता निरर्थक ठरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तापी नदीवर कायमस्वरूपी जोडणाऱ्या पुलाचे बांधकाम करण्याबाबत दिनांक ३० जुलै, २०२० रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री यांचे अध्यक्षतेखाली व सार्वजनिक बांधकाम मंत्री व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे प्रमुख उपस्थितीत, मुंबई येथे बैठक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे व त्यानुसार तापी नदीवर कायमस्वरूपी जोडणाऱ्या पुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. या रस्त्यावरील वाहतुक ही जानेवारी ते मे या कालावधीत तात्पुरत्या पुलाच्या सहाय्याने सुरळीत ठेवण्यात येते. तसेच जुन ते डिसेंबर या कालावधीत पावसाळयामुळे वाहतुक खंडीत होते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) उपरोक्त बैठकीत देण्यात आलेल्या सुचनेच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने शासन पत्र क्र. निम्नता १२२०/प्र.क्र.४२३/२०/मोप्र-१, दि. २.२.२०२१ नुसार निम्न तापी प्रकल्प पाडळसरे या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील तापी नदीवरील या पुलाच्या बांधकामाचा खर्च ५०:५०टक्के या तत्वावर करण्यास मान्यता दिली आहे.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ५०% वाटयाची तरतूद अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्याचे नियोजन राहील.

-----------------

## कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील वसाहतीतील जलवाहिन्या जीर्ण झाल्या असल्याबाबत

**(११) * २०४९९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे विकसित केलेल्या वसाहतीतील जलवाहिन्या जीर्ण झाल्या असल्याने जलवाहिनीतून दुषित पाणीपुरवठा होऊन या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिन्या टाकण्यासाठी उक्त परिसरातील नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनसुद्धा कोणतीच कार्यवाही न करता रहिवाशांना वाढीव पाणीपट्टी सिडकोमार्फत आकारण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडकोच्या सदर धोरणामुळे उक्त परिसरातील नागरिकांना दुषित पाणी प्यावे लागत असून त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार परिसरातील सिडको वसाहतीतील जीर्ण झालेल्या जलवाहिन्या तातडीने बदलण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.

कळंबोली नोडमधील जलवाहिन्या सन १९८५ साली टाकण्यात आल्या असुन सदर जलवाहिन्या जीर्ण झाल्या असल्या तरी त्यामधुन दुषित पाणीपुरवठा होत नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

कळंबोली वसाहतीतील जीर्ण जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिन्या टाकण्याच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असुन कामाचे कार्यादेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.

यापूर्वी पाण्याची दरवाढ सन २००५ मध्ये करण्यात आली होती, तदनंतर १५ वर्षात कुठलीही पाण्याची दरवाढ करण्यात आली नाही. सबब ऑगस्ट २०२० पासून पाण्याचे सुधारीत दर आकारण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहराचे नामांतर करून ते संभाजीनगर करण्याबाबत

**(१२) * २१५७६ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराचे नामांतर संभाजीनगर असे करण्याचा सविस्तर प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून दिनांक ४ मार्च, २०२० रोजी वा त्या सुमारास शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) होय खरे आहे.

औरंगाबाद शहराचे संभाजीनगर असे करण्याचा सविस्तर प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून दि.०४.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला.

(२) व (३) औरंगाबाद विभागाचा मराठवाडा, औरंगाबाद जिल्हा, औरंगाबाद उप विभाग, औरंगाबाद तालुका, व औरंगाबाद गाव याचे "संभाजीनगर" असे नामकरण करण्याबाबत महसूल व वन विभागाने दि. ०९.११.१९९५ रोजी प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध केली होती. तसेच औरंगाबाद शहराचे "संभाजीनगर" असे नामकरण करण्याबाबत नगर विकास विभागाने दि. ०९.११.१९९५ रोजी प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध केली होती. सदर अधिसूचनेविरुध्द श्री. महम्मंद मुश्ताक अहमद, तत्कालीन नगरसेवक यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे क्र.५५६५/९५ व ५५६६/९५ अशा दोन याचिका दाखल केल्या होत्या. सदर दोन्ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्या. त्याविरुध्द श्री. अहमद यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.९४१/९६ व ९४२/९६ दाखल केल्या होत्या. त्यावर दि.२९.०१.१९९६ रोजी सुनावणी होऊन सर्वोच्च न्यायालयाने दि.१७.०१.१९९६ रोजी जैसे थे स्थिती ठेवण्याबाबत आदेश दिले. गाव/शहराचे नाव बदलण्याचा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारितील असून तो राज्य शासनाच्या अधिकार कक्षेत येत नाही. त्यानुसार दिनांक २७.०६.२००१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार महसूल व वन विभाग व नगर विकास विभागाने अनुक्रमे दि. ०६.०९.२००१ व दिनांक ०३.१०.२००१ च्या अधिसूचनेद्वारे दि. ०९.११.१९९५ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप अधिसूचना रद्द केल्या. सदर अधिसूचना रद्द केल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १९.१२.२००२ रोजी प्रस्तुत याचिका निकाली (Dismiss) काढली आहे.

सदर प्रकरणाची उपरोक्त न्यायिक पार्श्वभुमी पाहता त्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येत असून त्यांचे अभिप्राय तसेच इतर आवश्यक मान्यता प्राप्त होताच प्रस्ताव केंद्र शासनास रितसर पाठविण्यात येईल.

-----------------

## अकोला (जि.अकोला) शहरात विविध कंपन्यांनी अनधिकृतपणे मोबाईल टॉवर उभारले असल्याबाबत

**(१३) * २२१३० श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) शहरात विविध कंपन्यांनी अनधिकृतपणे सुमारे २२० मोबाईल टॉवर उभारले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत टॉवर कंपनीने महानगरपालिकेचा कोट्यवधीचा महसूल बुडविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने मोबाईल कंपन्यांना नोटीस बजावूनही महानगरपालिकेच्या या आदेशाकडे सदर कंपन्यांकडून दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर मोबाईल कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अकोला महापालिका क्षेत्रात, महापालिकेच्या यंत्रणेकडून वेळोवेळी सर्वेक्षण सुरु असते व यामध्ये महापालिका क्षेत्रात, एकूण २३१ मोबाईल टॉवर आढळून आले आहेत.

यापैकी २१ मोबाईल टॉवर ला तत्कालीन ग्रामपचांयतीने तर ०१ मोबाईल टॉवरला जिल्हाधिकारी, अकोला यांनी परवानगी दिलेली आहे.

उर्वरित २०९ पैकी ३९ मोबाईल टॉवरला महापालिकेने परवानगी दिलेली होती, या ३९ टॉवरधारकांनी परवान्याचे नुतनीकरण केलेले नसल्याने, आज रोजी २०९ मोबाईल टॉवर अनधिकृत आहेत.

(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४४ अंतर्गत मोबाईल टॉवर ला परवानगी देण्यात येते. परवानगी करिता दाखल प्रकरणामध्ये Unified Development Control and Promotion

Regulations (UDCPR) मधील तरतुदीनुसार छाननी करुन परवानगी शुल्काचा भरणा करुन घेऊन परवानगी देण्यात येते.

तसेच नुतनीकरण प्रकरणामध्ये नुतनीकरण शुल्काचा भरणा करुन नुतनीकरण परवानगी देण्यात येते.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे आदेशानुसार मोबाईल टॉवर काढून टाकणे, मोबाईल टॉवर चा वीज पुरवठा बंद करणे तसेच मोबाईल टॉवर सेवा विस्कळीत करणे. इ. बाबी स्थानिक प्राधिकरणाने करु नयेत, असे आदेश आहेत.

जे टॉवर धारक परवानगी घेत नाही, अशा विरोधात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ अन्वये कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार, २०९ पैकी, ३७ कंपन्यांनी परवानगीकरिता महानगरपालिकेत अर्ज दाखल केले असल्याने, उर्वरित १७२ अनधिकृत मोबाईल टॉवर धारकांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत १७० मोबाईल टॉवरकरिता प्रति टॉवर परवानगी शुल्कापोटी रु.५०,०००/- असे एकूण रु.८५ लक्ष आणि ३९ टॉवरकरिता प्रती टॉवर नुतनीकरण शुल्क रु.३०,०००/- असे एकूण ११.७० लक्ष रुपये चा भरणा मोबाईल टॉवर कंपन्यांकडून करुन घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत असल्याने, महानगरपालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

-----------------

## मुंबईत ४० टक्के भूभागावर अनधिकृत झोपडपट्टी असल्याबाबत

**(१४) * २१२३० श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व लगतच्या महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे वाढली असून मुंबईत ४० टक्के भाग बेकायदा झोपड्यांनी वेढलेला असल्याची बाब दिनांक १४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. मुंबई उच्च न्यायालयाने आठ महानगरपालिका प्रशासनाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केलेली असून बेकायदा बांधकामाप्रकरणी राज्य

शासनासह मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मीरा - भाईंदर, वसई - विरार, कल्याण - डोंबिवली, भिवंडी - निजामपूर आणि पनवेल इ. महानगरपालिकांना आतापर्यंत किती बेकायदा बांधकामांविरोधात नोटीस बजावल्या, अनधिकृत बांधकामांवर कोणती कारवाई केली आहे, तसेच इमारत दुर्घटनेत किती नुकसान भरपाई दिली या सर्व बाबींची वार्डनुसार माहिती देण्याचे आदेश राज्य शासनाला देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे,

महापालिका कार्यक्षेत्रातील होणाऱ्या अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ५३ (१) व ५४ अन्वये नोटीसा बजावून निष्कासनाची कारवाई करण्यात येते. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी SUO-MOTU PIL १/२०२० याचिकेतील दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिकांकडून प्रतिज्ञापत्र सादर करण्याची कार्यवाही सुरु असुन सदर प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. मा. न्यायालयाच्या निर्णयात नुकसान भरपाईचा अंतर्भाव नाही. तथापि, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेने मृत व्यक्तींच्या वारसांना रु. ५०,०००/- व जखमींना रु. २५,०००/- मदत दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चांदिवली (मुंबई) क्षेत्रातील मिठी नदी बाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१५) * २१३१२ श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदिवली (मुंबई) विधानसभा क्षेत्रातील मिठी नदी शेजारील क्रांतीनगर, संदेशनगर, जरीमरी बामणडाया पाडा आदि भागात दिनांक २६ जुलै, २००५ रोजी वा त्या सुमारास झालेल्या अतिवृष्टीमध्ये पुराचे पाणी शिरुन मोठया प्रमाणात जिवित व वित्तहानी झाल्याने त्या भागातील मिठी नदी बाधित नागरिकांचे पुनर्वसन एच.डी.आय.एल. कंपनीतर्फे प्रिमिअर वसाहतीमध्ये बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये करण्याबाबत तत्कालिन मुख्यमंत्री यांनी निदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एच.डी.आय.एल. कंपनीतर्फे बांधण्यात आलेल्या प्रिमिअर वसाहतीमधील सदनिकांचे तत्कालिन मुख्यमंत्री यांनी जाहिर कार्यक्रम घेऊन चाव्यांचे वाटप करुन अलॉटमेंट पत्र देखील वाटप केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १५-१६ वर्षाचा कालावधी उलटूनही मिठी नदी बाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, झोपडीधारकांचे पुनर्वसन झालेले नसल्याने दरवर्षी पावसाळयात त्यांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असून सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार बाधित झोपडीधारकांचे तात्काळ पुनर्वसन करण्याकरिता शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे असे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले आहे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा.लि. (एम.आय.ए.एल.) ला कुर्ला प्रिमिअर येथील जागेवरील इमारत क्रमांक ०२, एफ विंगमधील ९३ सदनिका हस्तांतरीत केल्या होत्या. त्यामधील ५ सदनिका संदेश नगर झोपडपट्टीतील रहिवाशांना व ८८ सदनिका क्रांतीनगर झोपडपट्टीतील रहिवाशांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत दिनांक २८.०६.२०१९ रोजी वाटप करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार सदर रहिवाशांना दिनांक २६.०२.२०२१ रोजी सदनिकांची “जसे आहेत तसे” या स्वरुपात चाव्यांचे वाटप करण्यात आले आहे.

(३), (४) व (५) हे खरे आहे असे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले आहे.

एच. डी. आय. एल. व एम. आय. ए. एल. यांच्यातील करारनामा संपुष्टात आल्यामुळे शासनाच्या निर्देशानुसार एस.आर.ए. व एम.आय.ए.एल. यांच्यात कुर्ला प्रिमिअर कंपाऊंड येथील पुनर्वसन घटकासाठी बांधण्यात आलेल्या सदनिका हस्तांतरीत करण्याबाबत समझोता करारनामा-१ करण्यात आला आहे.

सदर करारनाम्यानुसार एम. आय. ए. एल. ला भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेल्या ४१५२ सदनिका “जशा आहेत तशा” स्वरुपात हस्तांतरीत करण्यात आलेल्या असून, उर्वरित ११,५०४ सदनिका “जशा आहेत तशा” स्वरुपात नोटीसीद्वारे हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत.

सदर सदनिकांची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून एम.आय.ए.एल. ला वारंवार कळविण्यात आले असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले आहे.

-----------------

## कोल्हापूर (जि.कोल्हापूर) शहरात अपुरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१६) * २५३०९ श्री.चंद्रकांत जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर (जि.कोल्हापूर) शहरात ९ ते १० कोटी लिटरची पाण्याची मागणी असतानाही १४.५० कोटी लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तरीही नागरिकांना अपुरा पाणीपुरवठा होत असल्याची तसेच काही भागात कमी दाबाने तर काही ठिकाणी पाणीच मिळत नसल्याची तक्रार

आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथे थेट सायफन पध्दतीने पाणीपुरवठा करण्याऐवजी प्रत्येक भागातील पाण्याची टाकी आधी भरुन घ्यावी, त्यानंतर टाकीतून पाणीपुरवठा करावा अशी उपाययोजना मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी सूचवली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, कोल्हापूर शहरासाठी पाणीपुरवठा करणा-या जलवाहिन्या जीर्ण व कालबाहय तसेच जलवाहिन्यातून पाणी चोरी होत असल्यामुळे ५० टक्के पाणी वाया जात असून सदर प्रकरणी संबंधित पाणीपुरवठा विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोल्हापूर शहराला मुबलक पाणी पुरवठा करण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) कोल्हापूर शहराच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सुमारे १३ कोटी लिटर इतक्या मागणीच्या प्रमाणात पाण्याचा उपसा करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) तांत्रिक बिघाड व देखभाल दुरुस्तीवेळी काही भागामध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याची वस्तुस्थिती नमूद करुन त्यावेळी टँकरद्वारेदेखील पाण्याची सोय केली जात असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) अशा आशयाची सूचना स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

• सद्यस्थितीत पुरेशा टाक्या उपलब्ध नसल्याने अमृत योजनेंतर्गत नवीन पाण्याच्या टाक्या तयार झाल्यानंतर तसेच, काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजना पुर्ण झाल्यानंतर उपरोक्त सूचनेनुसार पाण्याचे वितरण करण्याचे नियोजन असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) हे खरे नाही. तथापि, कोल्हापूर शहरासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या सुमारे ७० वर्षापुर्वीच्या असल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे.

• तथापि, सदर जुन्या जलवाहिन्यातून गळती झाल्यास तात्काळ दुरुस्त करण्यात येतात.

• सद्यस्थितीत अमृत योजनेतून जुन्या गळती होणाऱ्या जलवाहिन्या बदलण्याची कार्यवाही सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेकरिता सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा करणेबाबत

**(१७) * २२१२२ श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रासाठी सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून २१८ द.ल.लि. पाणीपुरवठा मंजूर असून सदर पाणीपुरवठा योजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योजनेतून प्राप्त होणारे २१८ द.ल.लि. पाणी मिरा भाईंदर शहरात वितरीत करण्यासाठी आवश्यक असणारी वितरण व्यवस्था तयार करणे, उंच जल कुंभ बांधणे व तद्अनुषंगिक कामे ही मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणार असून प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) महानगरपालिकेने तयार करुन तांत्रिक मंजुरीसाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक तपासणी शुल्क ४.९४ कोटी भरण्यास मिरा-भाईंदर महानगरपालिकेस कळविले असून त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेने तांत्रिक तपासणी शुल्क २५ लाख रुपये अदा केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत मागणी करण्यात आलेली ४.९४ कोटी रुपयांची रक्कम सदरच्या योजनेच्या खर्चात समाविष्ट करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान मंत्री पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडे केली आहे,

हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) • सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) महानगरपालिकेने दिनांक २१.०८.२०१९ रोजी तांत्रिक मंजूरीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर केलेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) • मिरा-भाईदर महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास रू. २५ लक्ष तांत्रिक तपासणी शुल्कापोटी अदा केले आहेत.

• महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मंजूरी मिळाल्यानंतर उर्वरित तांत्रिक तपासणी शुल्क महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात येणार आहे.

• सदर योजनेतील कामे मंजूरीनंतर पुढील २ वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्ह्यातून जाणाऱ्या सुरत-नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याबाबत

**(१८) * २०६४८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण)** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातून जाणारा सुरत-नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे तालुक्यातील फागणे व मोराणे प्र ल या गावांजवळ उड्डाणपूलाचे काम अपूर्णावस्थेत असून अपघातांचे प्रमाण वाढून त्यात प्रवाशांचे

मृत्युही होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर-सुरत राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरील फागणे ते नवापूर पर्यंत रस्ता चौपदीकरणाचे काम प्रलंबित असल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार शासनाने संबंधीत कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर प्रलंबित काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) सदर काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील आहे.

अंशत:खरे आहे,

सद्यस्थितीत अस्तित्वातील रस्त्याची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती कंत्राटदारामार्फत करण्यात येत आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.
(२) धुळे तालुक्यातील फागणे व मोराणे प्र ल या गावांजवळ अंडरपासचे काम अपूर्णावस्थेत आहे. परंतु, सदर ठिकाणी झालेले अपघात हे रस्त्याचे काम थांबल्यामुळे झाल्याची नोंद नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.
(३) हे खरे नाही.

सदयस्थितीत उर्वरीत चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे व कंत्राटदाराकडून वाहतुकीच्या सुरक्षिततेबाबत योग्य खबरदारी घेण्यात आली असून आवश्यक माहिती देणारे सूचना फलक लावण्यात आले आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.
(४) व (५) सदर चौपदरीकरणाचे काम कंत्राटदार मेसर्स फागणे सोनगढ एक्सप्रेसवे लि. यांचेमार्फत नोव्हेंबर २०१६ मध्ये हाती घेण्यात आले होते. सदर कंत्राटदराकडून सुमारे ६५% काम पूर्ण झाले आहे. तथापि त्यानंतर कंत्राटदाराच्या आर्थिक अडचणीमुळे कंत्राटदाराने पुढील काम थांबविल्यामुळे सदर कंत्राटदारासोबत करण्यात आलेला करारनामा ऑगस्ट २०१९ मध्ये खंडीत

करण्यात आला.

त्यानंतर उर्वरित कामासाठी कंत्राटदार मेसर्स जे.एम.म्हात्रे इन्फ्रा प्रा. लि.यांच्यासोबत करारनामा करण्यात येऊन दि.१८.०९.२०२० रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.त्यानुसार सद्यस्थितीत उर्वरित काम प्रगतीपथावर आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.

-----------------

## सिध्दार्थनगर, वांद्रे पूर्व (मुंबई) परिसरातील जय शीवसाई झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(१९) * २०७३५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे पूर्व (मुंबई) येथील सिध्दार्थनगर परिसरातील ५७७ झोपडपट्टीवासीयांना १९ वर्षापूर्वी हक्काच्या पक्क्या घराचे आश्वासन दिले असतानाही विकासक आणि झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाच्या वादग्रस्त कारभारामुळे अद्यापही जय शीवसाई प्रकल्पातील सुमारे ४८६ झोपडपट्टीधारक घरापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासक नेमण्यासाठी ७० टक्के रहिवाशांची संमती क्रमप्राप्त असताना फक्त ३२ टक्के सहमतीच्या आधारे जी.एम. कन्स्ट्रक्शन्सची नियुक्ती करण्यात आली, तसेच परिशिष्ट दोनवर प्राधीकृत अधिका-याचे सही शिक्के नसतानाही प्रकल्पाला एलओआय देण्यात आला, यामध्ये गैरव्यवहार झाल्याची शंका तत्कालीन सीईओ श्री. उज्जल उके यांनी व्यक्त केली होती. त्यानंतरही झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणातील आजी-माजी अधिका-यांनी विकासकास सहाय्य केले असल्याचा आरोप या प्रकल्पाच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्नशील असलेल्या श्री. श्रीप्रकाश मिश्र यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिटी सर्व्हे क्रमांक ६१५ या अतिक्रमित जमिनीचा समावेश प्रकल्पात करण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करण्यात आली, त्याबाबतच्या तक्रारींची खातरजमा न करताच विकासकाला ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले

असून मंजुर अतिरिक्त बांधकाम क्षेत्राचा रुपये १८ कोटींचा प्रीमियम विकासकाने भरलेला नसताना आणि नागरी विमान वाहतुक विभागाने ना-हरकत प्रमाणपत्र दिलेली नसतानाही इथल्या एका इमारतीला वापर परवाना (ओसी) देण्यात आला. तसेच शासकीय जागेवर बांधलेल्या संक्रमण शिबिराच्या बांधकामाचे भाडेही विकासकाने दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, २५० झोपडपट्टीवासीय आजही १०० संक्रमण शिबिरामध्ये वास्तव्याला आहेत, अन्य १५० झोपडपट्टीधारकांना मासिक रुपये ९ ते १२ हजार भाडे देण्याचे आश्वासन विकासकाने दिलेले असतानाही गत २ वर्षांपासून विकासकाने मासिक भाडे देणेही बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सातपैकी दोन टॉवरचे काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे सुरुच झालेली नाहीत, काम पूर्ण झालेल्या एका टॉवरमधील ८५ कुटुंबे वास्तव्याला गेली असतानाही तिथे पाणी आणि मल:निस्सारणाच्या अधिकृत जोडण्या नाहीत, या इमारतीमध्ये पावसाळ्यात पाणी गळती होते, विकासकाने निकृष्ट इमारत बांधून फसवणूक केल्याचा आरोप सदरहू कुटुंबांनी केला असून रहिवाश्यांनी दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास एसआरएचे सीईओ यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार विकासक तसेच संबंधित अधिकारी यांचेविरोधात कायदेशीर कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प शीघ्रगतीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) हे खरे नाही.

विषयांकित प्रकल्पामध्ये आजमितीस एकूण ५७७ झोपडीधारक असून पैकी ३८२ पात्र झोपडीधारक आहेत. सद्य:स्थितीत पुनर्वसन इमारत क्र.७ एकूण ८२ निवासी सदनिका, ३ अर्ध निवासी सदनिका, १ बालवाडी, १ वेल्फेअर सेंटर, १ संस्था कार्यालय याकरिता पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र दि.१६.०३.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच पुनर्वसन इमारत क्र.१ मध्ये एकूण ८३ निवासी सदनिका, २ अर्ध निवासी सदनिका, १ बालवाडी, १ वेल्फेअर सेंटर

करिता भोगवटा प्रमाणपत्र दि.१८.०९.२०२० रोजी मंजूर करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे पुनर्वसन इमारत क्र.२ करिता जोत्यापर्यंतची बांधकाम परवानगी दि.०७.१०.२०१९ रोजी मंजूर करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

मौजे बांद्रा, ता.अंधेरी, न.भू.क्र.६१५ व इतर या मिळकतीवरील संजय गांधी सह.गृह.संस्था, शिवदर्शन सह.गृह.संस्था व साईकृपा सह.गृह.संस्था या तीनही संस्थांचे विहित परिशिष्ट-२ तत्कालीन अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई उपनगर जिल्हा (पश्चिम उपनगरे) यांनी दि.२५.०२.२००३ रोजी निर्गमित केले आहे.

तसेच एकूण ३८२ पात्र झोपडीधारकांपैकी ३११ झोपडीधारकांनी विषयांकित योजनेसाठी (८२%) संमतीपत्र दिले आहे.

(३) हे खरे नाही.

न.भू.क्र.६१५ च्या ७/१२ मधील इतर शेरे रकान्यातील नोंदीप्रमाणे सदर जागा भूसंपादित करण्यात आलेली आहे. जमिन अधिमूल्य आकारण्याबाबत नगर विकास विभागाकडून दि.१६.०४.२००८ रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. तथापि, त्यापूर्वीच सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरीता प्रथम आशयपत्र दि.०२.०८.२००३ रोजी आणि प्रथम पुनर्वसन इमारतीकरीता मंजूर आराखडे दि.१२.१०.२००४ रोजी निर्गमित करण्यात आले. तद्नुषंगाने सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरीता दि.१६.०४.२००८ रोजीची अधिसूचना लागू करण्यात आली नाही. पुनर्वसन इमारत क्र.७ करिता नागरी विमान वाहतूक प्राधिकरणाने दि.२०.१२.२०१२ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र जारी केले होते. सदर ना-हरकत प्रमाणपत्र दि.१९.१२.२०१७ रोजीपर्यंत वैध होते. सदर इमारतीकरीता पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र दि.१६.०३.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले. नागरी विमान वाहतूक प्राधिकरणाने सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र दि.०६.०८.२०१९ रोजी निर्गमित केलेले असून त्याची वैधता दि.०५.०८.२०२७ पर्यंत आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत संक्रमण शिबीर मंजूर करण्यात आलेले आहे.

(४) सदर प्रकरणी विकासकाकडून प्राप्त माहितीनुसार विकासकाने एकूण ६६ झोपडीधारकांचे थकीत भाडे अदा केलेले नाही. याबाबत सहनिबंधक, सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेमार्फत उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन इमारत क्र.७ करीता इमारत पूर्णत्वाचा दाखला सादर केल्यानंतर दि.१६.०३.२०१७ रोजी नियमाप्रमाणे पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले. सदर इमारतीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पाणी जोडणी करण्यात आलेली आहे. तसेच भोगवटा प्रमाणपत्र जारी केल्यानंतर ३ वर्षात कोणतेही संरचनात्मक/बांधकामात दोष आढळल्यास विकासकामार्फत नि:शुल्क सुधारणा करण्यात येते.
(६) सदर तक्रारीच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांमार्फत स्थळ पाहणी करण्यात आली असता सदर तक्रारीत तथ्य आढळून आले नाही. तसेच जय शिवशाही एस.आर.ए. सह.गृह.नि.संस्थेतील रहिवाशांनी सदर तक्रार खोटी असल्याचे त्यांच्या दि.२५.०१.२०२१ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील रस्त्यांची कामे करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत

**(२०) * २३७५८ श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील मुख्य रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झालेली असून सदर रस्ते नव्याने तयार करण्याकरिता उल्हासनगर महानगरपालिकेने नगर विकास विभाग आणि एमएमआरडीए यांचेकडे दिनांक २ जुले, २०१८ रोजी वा त्या सुमारास प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्याची पुनर्बांधणी करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने व मा.लोकप्रतिनिधी यांनी एमएमआरडीएकडे EXTEND MUIP अंतर्गत दिनांक २ जुलै, २०१८ रोजी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ते तातडीने तयार करण्यासाठी मा.लोकप्रतिनिधी यांनी अनेक स्तरावर पत्रव्यवहार करूनही सदर प्रस्तावाला मान्यता मिळाली

नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर प्रस्तावास मंजुरी देण्यासाठी तसेच रस्त्याच्या पुनर्बांधणीकरिता निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाच्यावतीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय हे खरे आहे. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या दि. २७ जुलै, २०१८ रोजीच्या पत्रान्वये शहरांतर्गत विविध रस्त्यांच्या कामांना मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव एमएमआरडीएकडे सादर केला होता. त्याचप्रमाणे मा. लोकप्रतिनिधींकडून देखील एमएमआरडीएच्या विस्तारीत एमयुआयपी प्रकल्पांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत वेळोवेळी मागणी केली आहे.
(३), (४) व (५) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील रु. ९६.१४ कोटींची एकूण ५ रस्त्यांची कामे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये एमएमआरडीएमार्फत हाती घेण्यात आली असून सदय:स्थितीत शहाड ते म्हारळ रा. म. क्र. २२२ (जूना) रस्त्याचे काम पूर्ण झाले असून सदर रस्ता उल्हासनगर महानगरपालिकेस हस्तांतरण करण्याची प्रक्रीया सुरु आहे, तसेच उर्वरीत रस्त्याची कामे पूर्ण होण्याच्या अंतिम टप्प्यात आहेत.

-----------------

## पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या ताब्यातील मोकळे भूखंड महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करणेबाबत

**(२१) * २०३८६ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड शहरात महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाल्यानंतर कारखानदारीमुळे शहरात वास्तव्य करणाऱ्या कामगार व गरिबांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून देणे या उद्देशाने सन १९७२ मध्ये पिंपरी- चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली

होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राधिकरण स्थापनेवेळी १२.५% परताव्याचे आमिष दाखवून प्राधिकरणाने शेतकऱ्यांकडून अल्प दराने जमीन खरेदी केली असून अनेक भूमिहीन शेतकऱ्यांनी आपल्या ताब्यातील जमीन प्राधिकरणाला देऊनही अद्यापही त्यांना १२.५% परतावा मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातील विकसित असलेला भाग हा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये तर अविकसित भाग हा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत समाविष्ट करण्याची शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राधिकरणातील भूमिपुत्रांच्या जमिनी व्यवसायिक विकासकांना देण्याकरिता मोठ्या प्रमाणावर प्राधिकरण विलीनीकरणाचा प्रयत्न शासनामार्फत करण्यात येत असल्याबाबत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे शासनाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्राधिकरणाच्या विकसित भागाबरोबर अविकसित असलेला भाग महानगरपालिकेमध्ये वर्ग करावा तसेच संपूर्ण आरक्षित भूखंड तातडीने महानगरपालिकेकडे वर्ग करावेत अशी मागणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील नागरिक व पदाधिकारी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, प्राधिकरणाच्या दुर्लक्षामुळे संपादित केलेल्या जमिनींचा विकास करण्यास जाणीपूर्वक दुर्लक्ष केल्याने सदर ताब्यात आलेल्या जमिनींचा विकास होऊ शकला नाही तसेच भूमिपुत्रांच्या घेतलेल्या जमिनी व्यवसायिक विकासकांना देण्याकरिता नवनगर विकास, पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या उच्चपदस्थ अधिकारी व बांधकाम व्यवसायिक यांच्या आर्थिक संगनमताने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण बरखास्त करित असतानासुध्दा मोकळा भूखंड पीएमआरडीएमध्ये समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार १२.५% मोबदला न देता भूमिपुत्रांच्या ताब्यात घेतलेल्या प्राधिकरणातील जमिनी मोकळे भूखंड हे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) • पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातील जमिनीचे संपादन तत्कालीन भूमीसंपादन कायद्यांतर्गत करण्यात आले असून सदर जमिनींच्या बदल्यात जमिन मालकांना नियमानुसार योग्य असा मोबदला देण्याच्या अनुषंगाने आवश्यक रक्कम जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे जमा करण्यात आलेली आहे. सदर रक्कम तत्कालीन कायद्यानुसार व नियमानुसार जमा केलेली आहे.

• अद्यापर्यंत पर्यंत बहुतांशी जमिन मालकांना जमिनीचा मोबदला अदा करण्यात आलेला असून, काही जमिनधारकांनी मा.उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केलेली असल्यामुळे, तसेच वारसातील होणारे वाद या कारणांमुळे त्यांना मोबदला अदा करणे शक्य झालेले नाही.

• प्राधिकरणाची स्थापना सन १९७२ मध्ये झाली. तेव्हापासून भूसंपादन त्या-त्या वेळच्या भूसंपादन कायद्यातील तरतूदीनुसार झाले व त्याप्रमाणे जमिन मालकांना मोबदला प्रदान करण्यात आला आहे. सन दि.०१.०१.१९८४ पासून संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात ज्या जमिनीचे ताबे प्राधिकरणास प्राप्त झाले आहेत, अशा जमिन मालकांना संपादित जमिनीच्या १२.५ टक्के जमिन परतावा करण्याबाबत अनुक्रमे दि.३.३.१९९० व दि.१५.०९.१९९३ च्या शासन निर्णयान्वये धोरण लागू करण्यात आले आहे.

• त्यानुसार अद्यापर्यंत ३५८ लाभार्थ्यांना परतावा देण्यात आलेला असून उर्वरित २०८ लाभार्थ्यांना विविध न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे व जमिनीच्या मालकीचे वादामुळे अद्यापही ताबा देणे शक्य झालेले नाही.

• तसेच सन १९७२ ते १९८३ पर्यंतच्या लाभार्थ्यांना सदर परतावा योजनेचा लाभ देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) असा कोणताही निर्णय अद्याप झालेला नाही.

(४) प्राधिकरणातील भूमिपुत्रांच्या जमिनी खाजगी विकसकांना देण्यात येत असल्याबाबतची तक्रार स्थानिक मा.विधानसभा सदस्य यांनी दिनांक २७.०८.२०२० च्या पत्रान्वये शासनाकडे तसेच पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडे केलेली आहे.

(५) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांचे क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात वर्ग करावे व उर्वरित भाग पी.एम.आर.डी.ए. मध्ये वर्ग करावा अशा स्वरूपाचे पत्र स्थानिक मा.लोकसभा सदस्य यांनी शासनास दिले आहे, हे खरे आहे.

(६) व (७) • पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा समावेश करण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पूर्व) मुंबई येथील एमआयजी क्लब व्यवस्थापन व म्हाडा यांचेमध्ये कराराचा भंग झाल्यामुळे संबंधित जमीन शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत

**(२२) * २५५१७ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड)** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) मुंबई येथील एम.आय.जी. क्लब व्यवस्थापन व म्हाडा यांचेमध्ये सन २००४ मध्ये करार होवून वांद्रे येथील शाळेकरिता आरक्षित असलेला ३६५० चौ.मी. भूखंड एम.आय.जी व्यस्थापनास भाडेकराराने देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कराराच्या अनुषंगाने एम.आय.जी. क्लब व्यवस्थापनाने या जागेवरील शाळेची इमारत बांधून देणे आवश्यक असताना अद्यापपर्यंत संबंधित क्लबने शाळेच्या इमारतीचे बांधकाम न करता कराराचा भंग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कराराचा भंग केल्याप्रकरणी संबंधित क्लबला माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान दंडाची नोटीस बजावण्यात आली असता त्यावर क्लबने सादर केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार कराराचा भंग केल्यामुळे करार रद्द करून सदरहू

भूखंड पुन:श्च शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत तसेच विलंबास जबाबदार असणारे दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेवर तातडीने कारवाई करून संबंधित क्लबकडून दंडाच्या रक्कमेची वसूली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) व (२) हे खरे आहे .

(३), (४) व (५) म्हाडा, प्राधिकरण ठराव क्र .६८१४, दि .२४/०१/२०१९ नुसार एम.आय.जी. क्लब यांच्याकडून रु. ५३.६५ कोटी दंडात्मक रक्कम वसूल करण्यास मान्यता दिली असून, दि. १२/०३/२०१९ रोजी म्हाडाकडून सदरहू संस्थेस नोटीस बजावण्यात आलेली आहे .

उपरोक्त नोटीस रद्द करण्याबाबत संस्थेने म्हाडास दि. २१/०५/२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे. संस्थेने सादर केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने तपासणी म्हाडाकडे सुरु आहे.

तसेच माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेला भूखंड क्र .६३८/ ब हा नवजीवन शिक्षण संस्थेस दीर्घकाळ भाडेतत्वावर वितरीत करण्यास म्हाडा प्राधिकरणाचा ठराव क्र. ६८६०, दि.१८/०६/२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मुंबई मंडळाकडून सदरहू संस्थेस दि.१३/१२/२०१९ अन्वये प्रचलित अटी व शर्तीनुसार देकार पत्र देण्यात आलेले आहे .

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या जलाशयांमार्फत मोठ्या प्रमाणात अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(२३) * २१९३४ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत २७ जलाशयांमार्फत शहर आणि उपनगरात पाण्याचे वितरण करणाऱ्या जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्यांमध्ये तेथील अशुद्ध आणि दूषित पाणी शिरत असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान

निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे झोपडपट्टया, चाळी तसेच इमारती अशा बहुतांश वस्त्यांमध्ये अशुद्ध पाण्याचा पुरवठा होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईच्या पाणी वितरण व्यवस्थेमधील गळतीचे प्रमाण २५ ते ४० टक्के असून ८६२ ते १३०० दशलक्ष लिटर पाणी गळतीमुळे वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील पाणी वितरण व्यवस्थेमधील गळतीचे प्रमाण रोखून मुंबईकरांना शुद्ध पाणी पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) मुंबईला तीन महासंतूलन जलाशय व २७ सेवा जलाशयाच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्यात येतो.

सदर जलवाहिन्या जुन्या व जीर्ण झाल्यास, रस्ते, पूल व मेट्रो यांसारख्या पायाभूत सुविधांची कामे सुरु असतांना त्यास हानी पोहोचल्यास त्यातून गळती होते. तसेच कार्यान्वित नसतांना गळतीच्या ठिकाणातून त्यामध्ये अशुध्द/सांडपाणी आत गेल्यास त्या जलवाहिनीद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे काही ठिकाणी/ठराविक भागात अशुध्द पाणी पुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जलवाहिनींची व जलजोडण्यांची लांबी व संख्या लक्षात घेता, मुंबईतील गळतीचे अचूक प्रमाण ठरविणे कठीण असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) मुंबईतील पाणी वितरण व्यवस्थेमधील गळतीचे प्रमाण रोखून मुंबईत शुध्द पाणी पुरवठा करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

- **जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलून त्याठिकाणी नवीन जलवाहिनी टाकणे -** मागील तीन वर्षांत सुमारे ५०.७६ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या बदलून त्याठिकाणी नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत.
- **सेवा जलजोडण्यांचे नुतनीकरण करणे -** मागील तीन वर्षांत सुमारे ५१,५२३

जलजोडण्यांचे नुतनीकरण करण्यात आले आहे.

• **सेवा जलजोडण्यांच्या जुडग्यांऐवजी एक सामाईक जलवाहिनी टाकणे -** सुमारे ३०५ ठिकाणी जलजोडण्यांचे जुडगे काढून सामाईक जलवाहिनी तसेच स्टब मेन्स टाकण्यात आल्या आहेत.

• गळतीची ठिकाणे शोधून त्यांची दुरुस्ती करणे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगोला (जि.सोलापूर)- इंदापूर (जि.पुणे) या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याबाबत

**(२४) * २३७८८ ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर)- इंदापूर (जि.पुणे) या रस्त्याची गत पावसाळ्यात अत्यंत दुरवस्था झाली असून सदर रस्त्यावरील अनेक पूल मोडकळीस आले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता हा दोन राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा असल्यामुळे रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते तसेच, सदरहू रस्त्याला जोडणारे सर्व रस्ते ही सिमेंटचे बनविलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांगोला- इंदापूर रस्ता सिमेंटचा बनविण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, तसेच सदर रस्त्याच्या कामास केंव्हापर्यंत सुरुवात होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, सदर रस्ता व रस्त्यावरील पुलांची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) सन २०२० मधील अतिवृष्टीमुळे रस्ता क्षतीग्रस्त

झाला होता.

(२) रस्त्यावर मोठया प्रमाणावर वाहतूक वर्दळ होते, हे खरे आहे. तथापी रस्त्याला जोडणारे सर्व रस्ते कॉंक्रिटचे आहेत, हे खरे नाही.

(३) सांगोला-इंदापूर रस्त्यांपैकी राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ जी मधील इंदापूर ते अकलूज रस्ता हा संत तुकाराम महाराज पालखी मार्गाचा भाग असून सदर रस्ता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारितील आहे. या रस्त्याच्या अस्तित्वातील दुपदरी डांबरी रस्त्याचे चौपदरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा विषयक प्रक्रिया प्रगतीत आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पंढरपूर यांनी कळविले आहे.

उर्वरीत अकलूज ते सांगोला रस्त्याचे १० मी.रुंद कॉंक्रिटीकरण (साईड पट्टीसह) करण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता सद्यस्थितीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आला आहे. तरी सदर काम केंद्र शासनाच्या प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्यात येणार आहे.

(४) रस्त्याची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वांद्रे (प.) येथील लिलावती रूग्णालयाच्या अनियमित कारभाराबाबत

**(२५) * २०७५९ श्री.संजय पोतनीस (कलिना)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबागहून अतिदक्षता रुग्णवाहिकेतून औषधोपचाराकरिता मुंबईतील वांद्रे (प.) येथील लिलावती रूग्णालयात दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास दाखल होण्याकरिता आलेले रुग्ण श्री.विकास म्हात्रे यांना रूग्णालयात दोन लाख रुपये जमा केल्याशिवाय दाखल करून घेता येणार नाही, असे सांगितले असता त्यांच्या ओळखीच्या लोकप्रतिनिधिंनी एक लाख रूपयांची मदत करून उर्वरित रक्कम दुसऱ्या दिवशी भरू अशी विनंती रुग्णालयाकडे केल्यानंतरही रूग्णाला दाखल करून न घेता दुस-या दिवशी सर्व रक्कम भरल्यानंतर दाखल करून घेण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाच प्रकारची वागणूक स्वत: लोकप्रतिनिधींना देखील मिळाली असून लोकप्रतिनिधी अचानक दाखल होण्यासाठी गेले असतांना त्यांना रुपये २.५० लाख  जमा केल्यानंतर दाखल करून घेतले जाईल असे सांगण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयाकडे तक्रार  केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त रूग्णालयाच्या अनियमित कारभाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार शासन स्तरावर पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्‌धव ठाकरे :** (१) होय.

श्री. विकास दत्तात्रय म्हात्रे हे दिनांक ११/११/२०२० रोजी अलिबागहून मुंबईतील वांद्रे (प.) येथील लिलावती रुग्णालयात वैद्‌यकिय उपचार घेण्याकरीता आले असता त्यांना रुपये २,००,०००/- इतकी रक्कम भरल्याशिवाय रुग्णालयात दाखल करण्यात येणार नसल्याचे सांगण्यात आले. तथापि, यासंदर्भात रुग्णालयाने केलेल्या खुलाश्यानुसार, श्री. म्हात्रे दिनांक ११/११/२०२० रोजी रुग्णालयात दाखल होण्यासाठी आले असता, डॉक्टरांनी त्यांची प्राथमिक तपासणी करुन त्यांना अतिदक्षता विभागात दाखल करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले व त्याच दिवशी रुग्णालयात दाखल करुन घेतले. तसेच, रुग्णाचा मुलगा श्री. विशाल विकास म्हात्रे यांच्याद्‌वारे अनामत रक्कम रुपये २,००,०००/- भरण्यात आली. सबब, रुग्ण तातडीचा असूनही त्यांच्याकडून अनामत रक्कम भरल्यानंतर त्यांना दाखल करुन घेण्यात आले अशा स्वरुपाची तक्रार असल्याने, सकृतदर्शनी मा. उच्च न्यायालयीन योजनेतील खंड ३ चे उल्लंघन रुग्णालयाकडून झाल्याचे दिसून येते.
(२) होय.

तथापि, मा. विधानसभा सदस्य यांची मेडिक्लेम पॉलिसी ज्या इन्शुरन्स कंपनीची होती, ती इन्शुरन्स कंपनी संबंधित रुग्णालयाशी संलग्न नसल्यामुळे त्यांना कॅशलेस सुविधा देता आले नाही.

(३) होय.

(४) यासंदर्भात सहाय्यक धर्मादाय आयुक्त (रुग्णालय), बृहन्मुंबई, मुंबई विभाग, यांनी दिनांक २५/०१/२०२१ रोजी आदेश करुन रुग्णालयाला खुलासा सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुषंगाने रुग्णालयाने दिनांक १६/०२/२०२१ रोजी ई-मेलद्वारे आपले म्हणने सादर केले आहे. सबब, त्यानुसार रुग्णालय निरीक्षक यांचेकडून अहवाल तयार करण्यात आला असून सदर अहवालानुसार संबंधित रुग्णालयाकडून मा. उच्च न्यायालयीन योजनेच्या खंड ३ चे उल्लंघन झाल्याचे दिसून येते. सदर अहवालावर सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी प्रस्तूतची तक्रार दिनांक १७/०२/२०२१ रोजी देखरेख समितीसमोर ठेवण्याचे आदेश पारित केले असून सदरची तक्रार देखरेख समिती समोर दिनांक १७/०३/२०२१ रोजी सुनावणी करिता ठेवण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि. रायगड) शहरातील कोतवाल व्यायाम मंदिराच्या जागेवर नव्याने होत असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत

**(२६) * २०५२२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि. रायगड) शहरातील कोतवाल व्यायाम मंदिराच्या जागेवर अनधिकृत बांधकाम होत असून त्याविरोधात कारवाई करण्याची मागणी कर्जत नाभीक समाज सामाजिक संस्थेने गत दीड वर्षापासून तहसीलदार, कर्जत, मुख्याधिकारी, कर्जत नगरपालिका आदिंकडे वारंवार लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत सातत्याने तक्रारी करुनही शासनाच्या संबंधित अधिका-यांकडून कोणतीही कारवाई करण्यात येत

नसल्याच्या विरोधात दिनांक २ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास कर्जत येथील नाभीक समाज बांधवांकडून दुकाने बेमुदत काळाकरिता बंद ठेवून टिळक चौक येथे आमरण उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकामासंदर्भात वारंवार तक्रारी करुनही सदरहू बांधकाम आजमीतीस निष्कासीत न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार सदरहू अनधिकृत बांधकाम विनाविलंब निष्कासीत करण्याकरिता तसेच संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(२), (३) व (४)

• रायगड जिल्ह्यातील कर्जत नगरपरिषदेच्या हद्दीतील कोतवाल व्यायाम मंदिराच्या जागेवरील बांधकामास दिनांक १७/०६/२०२० रोजी कर्जत नगरपरिषदेने बांधकाम नकाशा मंजुर करुन बांधकाम परवानगी दिलेली आहे. त्यामुळे सदरचे बांधकाम अनधिकृत नसुन त्याबाबतची वस्तुस्थिती नगरपरिषदेतर्फे वेळोवेळी तक्रारदारांना कळविण्यात आली आहे.

• सदर बाबतीत तक्रारदार यांनी उपोषणास बसु नये म्हणून दिनांक ०१/०१/२०२१ रोजी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी घेण्यात आली होती. त्यानुषंगाने नगरपरिषदेतर्फे कागदोपत्री खुलासा सादर करण्यात आला आहे.

• तसेच, तक्रारदारामार्फत उपोषणाचा इशारा दिल्यानंतर नगरपरिषदेमार्फत उपोषण न करण्याचे आवाहन करण्यात आले होते. तथापि, तक्रारदाराने यासंदर्भात उपोषण केले असल्याची वस्तुस्थिती नगरपरिषदेने कळविली आहे.

• सदरचे बांधकाम अधिकृत असल्याने कार्यवाही करण्यात आली नसल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करून ठेकेदाराला देयके अदा करण्यात आल्याबाबत

**(२७) * २४००८ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील सेवानिवृत्त झालेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करून ठेकेदाराला एकूण ४.७५ कोटी रूपयांचे देयक दिले गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या मल:निसारण प्रकल्पामध्ये पाटील कन्स्ट्रक्शन अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीला सुमारे ५ कोटी ८८ लाख २४ हजार ५०५ रूपयांचे देयक परस्पर मल:निसारण अधिकाऱ्याच्या संगनमताने दिले गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुणे महानगरपालिकेतील मल:निसारण विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाचे वृत्त दै. लोकमत या वृत्त पत्रात दि.२५.०१.२०२१ रोजी आले होते.

(२) व (३) • पुणे शहरातील मैलापाणी व्यवस्थापनासाठी मैलापाणी गोळा करणाऱ्या वाहिन्या व मुख्य वाहिन्या विकसित करणे या कामाकरीता निविदा क्र.२५६-२०१६ या निविदेचा समावेश करण्यात आला होता.

• या निविदेकरीता रू.५६,५७,९६,८१९/- एवढे पूर्वगणनपत्रक निश्चित केले होते.

• सन २०१९-२०२० च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये विषयांकित कामासाठी एकूण ७ कोटी एवढी तरतूद मंजूर झाली होती. परंतू सदर तरतूद विविध रक्कमांच्या क्षेत्रिय कार्यालयाकडील व मुख्य ड्रेनेज विभागाकडील कामांसाठी दिल्यामुळे सदर कामातील दि.०१.०७.२०१८ ते दि.१५.०१.२०१९ या कालावधीतील बारावे रनींग बील ठेकेदारास अदा करणे शक्य झाले नाही. व बील अदा करण्यास विलंब झाला.

• तथापि, सदर रकमेतील उर्वरित अखर्चीत रक्कम रू.५.१६ कोटी या योजनेसाठी नोव्हेंबर, २०१९ नंतर उपलब्ध झाल्यावर सदर रक्कम ठेकेदारास दि.०७.१२.२०१९ रोजी अदा करण्यात आलेली आहे.

• १२ व्या रनींग बीलाच्या कालावधीत कार्यरत असलेले अधिक्षक अभियंता दि.३१.०८.२०१९ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. तथापि, सदर बीलाच्या कालावधीत सदरहू अधिक्षक अभियंता कार्यरत होते. त्यामुळे त्यांनी या कामाच्या बील फॉर्मवर सही केली होती. तथापि, त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर सदरचे बील प्रत्यक्षात दि.०७.१२.२०१९ रोजी अदा करण्यात आले आहे.

• जागेवर काम पूर्ण झाल्यानंतर ठेकेदाराने सादर केलेले कामाच्या रनींग बिलाबाबत नियमानुसार तपासणी करण्यात आली असून, त्यानुसारच देयके अदा केलेली आहेत, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील चक्राकार मार्गासाठी (रिंगरोड) भूसंपादन प्रक्रिया कालमर्यादेत व वेगाने राबविण्याबाबत

**(२८) * २२६२५ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृध्दी महामार्गाच्या धर्तीवर पुणे येथे चक्राकार मार्गासाठी (रिंगरोड) भूसंपादन प्रक्रिया कालमर्यादेत आणि वेगाने राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र महामार्ग अधिनियमानुसार या भूसंपादनासाठी शेतकरी आणि जमीन मालकांना बाजारमूल्यानुसार योग्य मोबदला निश्चित करण्यास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प कधीपासून सुरु होणार असून याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) भूसंपादन हे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ अंतर्गत तरतूदीनुसार करण्यात येईल.

(३) भूसंपादनाची प्रक्रीया सूरू करणेची तयारी होत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गुहागर (जि. रत्नागिरी) नगरपंचायत क्षेत्रात १४ व्या वित्त आयोग योजनेंतर्गतची कामे बनावट प्रमाणपत्र सादर करून मंजूर केल्याबाबत

**(२९) * २४१६४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर नगरपंचायतीने (जि. रत्नागिरी) १४ व्या वित्त आयोग योजनेंतर्गतच्या कामांची निविदा दिनांक २/११/२०१८ रोजी वा त्या सुमारास प्रसिध्द करून मंजूर केलेली कामे ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जमिनीमध्ये असावीत असा नियम असताना ४१ पैकी ३२ कामे ही नगरपंचायतीच्या मालकीच्या जागेत नसल्याची बाब मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांनीच दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास अर्जदार श्री. जयदेव मुरलीधर मोरे (रा. गुहागर) यांना माहितीच्या अधिकाराखालील माहितीमध्ये दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना चौकशीचे आदेश देऊन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल तात्काळ सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून सदर प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्यात काय नमूद करण्यात आले आहे,

(४) असल्यास, सदर अहवालानूसार मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर तसेच सदर कामांना मंजुरी देणाऱ्या प्रक्रियेतील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) गुहागर नगरपंचायत हद्दीत १४ व्या वित्त आयोग योजनेंतर्गत करावयाच्या "रस्ते, पाखाडी, गटार आणि संरक्षण भिंत" अशा दिनांक ०२/११/२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या ४१ कामांपैकी २४ कामांच्या जागा ह्या नगरपंचायत मालकीच्या असल्याची कागदपत्रे उपलब्ध नसल्याची बाब माहिती अधिकारांतर्गत अर्जदारास कळविल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणाची चौकशी अंतिम टप्प्यामध्ये असून चौकशी पूर्ण झाल्यानंतर शासनास अहवाल सादर करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेने कोविड-१९ करिता काढलेल्या आरोग्य सामग्री खरेदी निविदेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३०) * २०५३८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने कोविड-१९ ला प्रतिबंध करण्यासाठी आरोग्य सामग्री विकत घेण्याकरीता काढलेल्या निविदेमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेकडून दररोज ५००० पीपीई किट खरेदी करण्यात येत होते व खरेदी केलेल्या संपूर्ण पीपीई किट सोबत एन-९५ मास्क असा एकूण दर रु. २०७ अतिरिक्त देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इंफ्रारेड थर्मोमीटर रेंज ३० अंश सेल्सिअस ते ५०० अंश सेल्सिअस पर्यंत तसेच पल्स ऑक्सिमीटर सोबत अडजस्टेबल ब्राईटनेस आणि ड्युल कलर ओएलइडी डिसप्ले सोबत सहा डिसप्ले मोड या वैद्यकिय साहित्याची गरज नसतांना बाजार भावापेक्षा जास्त दराने खरेदी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १०० इंफ्रारेड थर्मोमीटर व ८०० पल्स ऑक्सिमीटर हे वैद्यकिय साहित्य प्रत्येकी रु. ६५०० व रु. १५०० या दराने खरेदी करण्याकरीता ऑर्डर दिलेली असता सदर किमंत ही बाजारभावापेक्षा ३० टक्के जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वांद्रे-वर्सोवा आणि वर्सोवा-विरार या सागरी सेतू प्रकल्पाच्या कामांबाबत

**(३१) * २१४८७ श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी तसेच सुखकर प्रवास होण्यासाठी महत्वाचे असलेले वांद्रे-वर्सोवा आणि वर्सोवा-विरार हे दोन्ही सागरी सेतूचे काम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सागरी सेतूंना जूहू कोळीवाडा बाह्यमार्ग आणि वर्सोवा येथून पुढे हा मार्ग पश्चिम द्रुतगती मार्गाला जोडण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास वर्सोवा - विरार या सुमारे ४२.७५ किमी लांबीच्या सागरी सेतू मार्गाचा पूर्व सुसाध्यता अभ्यास पूर्ण करण्यात आला असून सदर सेतू मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दोन्ही सागरी सेतू पूर्ण करण्याबाबत तसेच सदर प्रकल्पांची उभारणी करीत असताना स्थानिक मच्छिमारांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर प्रकल्प पूर्ण होण्यास रस्ते विकास महामंडळाला किती कालावधी लागणार आहे व या दोन्ही सागरी सेतू प्रकल्पासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, खरे आहे.

वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू प्रकल्पाचे काम दि. २४/०६/२०१९ रोजी (कंत्राटदार नियुक्ती दिनांक) सुरू करण्यात आले असून सदर प्रकल्प कंत्राटदार नियुक्तीच्या आदेशापासून ५ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तसेच वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्पाचा पूर्व सुसाध्यता अभ्यास पूर्ण करण्यात आला असून सविस्तर प्रकल्प अहवालासाठीचे काम हाती घेण्यात येणार आहे.

(२) होय, खरे आहे.

सदर सेतूची जोडणी पश्चिम द्रुतगती मार्गाला जोडण्यासाठी प्रकल्पाचा सविस्तर सुसाध्यता अभ्यास प्रगतीपथावर आहे.

(३) होय, खरे आहे.

सविस्तर प्रकल्प अहवालाचे काम हाती घेण्यात येणार आहे.

(४) प्रकल्पाची उभारणी करत असताना स्थानिक मच्छिमारांच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी शासनाने दि. ०७/०२/२०१९ रोजी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले असून त्यानुसार म.रा.र.वि. महामहामंडळाने मस्त्यव्यवसाय विभाग यांचा शिफारशीवरून दि.२३/१२/२०२० रोजी समितीची स्थापना केली आहे. तसेच, मच्छिमारांच्या विनंतीनुसार टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स (TISS) या संस्थेला मच्छिमारांच्या समस्याचे अभ्यास करण्यासाठी नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूसाठीचा अंदाजित खर्च रु.११,३३२.८२ करोड (सन २०१८) आहे. सदर प्रकल्प ५ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

वर्सोवा-विरार सागरी सेतू ढोबळ मानाने अंदाजित खर्च रु. ३२,८६५.४६ करोड (सन २०१९) आहे. याचा सविस्तर अहवाल हाती घेण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही. .

-----------------

## हिंगणघाट (जि.वर्धा) नगरपरिषदेअंतर्गत वना नदीवरील बंधाऱ्यास मंजुरी देण्याबाबत

**(३२) * २४२७१ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) नगरपरिषदेअंतर्गत वना नदीवरील पाणीपुरवठा बंधाऱ्याच्या जलसंपदा विभागाने ठेव तत्वाच्या आधारावर सादर केलेल्या बंधाऱ्याच्या प्रस्तावास तातडीने मंजुरी देण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगणघाट शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी वना नदीवरील बंधाऱ्यास मंजूरी देण्याची विनंती नगरपरिषदेने दिनांक २६.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये केली होती व त्याअनुषंगाने, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने दिनांक ११.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये त्रुटी मुख्याधिकारी, हिंगणघाट नगरपरिषद यांना कळविल्या असून त्याबाबतचा पुर्तता अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा आणि गडर लाईनचे काम पूर्ण झालेले असून शासनाकडून जवळपास १८० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून ९० टक्के पेक्षा जास्त काम झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमृत योजनेसाठी लागणाऱ्या बंधाऱ्याचे अंदाजपत्रक जलसंपदा विभागाने DMA ऑफिसला दिलेले असून अजूनपर्यंत हा बंधारा पूर्ण झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अमृत योजनेचा फायदा जनतेला व्हावा या दृष्टीने बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) • हिंगणघाट शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी वना नदीवरील बंधाऱ्यास मंजूरी देण्याची विनंती नगरपरिषदेने दिनांक २६.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये केली होती.

• त्याअनुषंगाने, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने दि.११.०९.२०१९, दिनांक २७.११.२०२०, दि. २८.०१.२०२१ व दि. २५.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, हिंगणघाट नगरपरिषद यांना त्रुटी कळविल्या असून त्याबाबतचा पुर्तता अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) • केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत मंजूर हिंगणघाट नगरपरिषदेस पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून आतापर्यंत रुपये ७४.८०७ कोटी इतका निधी नगरपरिषदेकडे प्राप्त झाला आहे. त्याशिवाय सदर प्रकल्पांसाठी रुपये २४.९३ कोटी एवढा निधी नगरपरिषदेने उभारलेला आहे. असा एकूण रुपये ९९.७३७ कोटी एवढा निधी सदर प्रकल्पांसाठी नगरपरिषदेकडे उपलब्ध आहे.

• सद्यस्थितीत दोन्ही प्रकल्पांचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे.

(४) (५) व (६) • वना नदीवर नवीन बंधारा बांधण्याचा प्रस्ताव मुख्याधिकारी, हिंगणघाट नगरपरिषद यांच्याकडून दिनांक २६.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये नगर विकास विभागाकडे सादर केला होता. तो तपासणीसाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे पाठविला आहे.

• सदर बंधाऱ्यासंदर्भात मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांनी हिंगणघाट पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याचे निरीक्षण व उपाययोजनेबाबत खालील निरीक्षण नोंदविले आहे.

• वना नदीवर सन २०१० मध्ये बंधाऱ्याचे बांधकाम केले होते. तद्नंतर माहे जुलै, २०१२ मधील पूरामध्ये नदीपात्रावरील उजव्या तीरावर बहिर्गमन (Out Flanking) झालेले असून नदीपात्राची दिशा बदलली आहे. सदर बंधाऱ्यावरील उर्वरीत खाबांचे काम पूर्ण केल्यास त्याचा वापर अल्पावधीत सुरु करता येईल.

• नवीन बंधारा बांधल्यास पूर्वीच्या बंधाऱ्याचा खर्च व्यर्थ ठरुन लेखापरिक्षणात आक्षेप उपस्थित होतील.

• या परिस्थितीत सध्याचा बंधारा दुरुस्त करावा की नवीन बंधारा बांधावा याबाबत निर्णय घेऊन कारणीमासांसह प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसह प्रस्ताव सादर करावा असे नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत दिनांक ११.०९.२०१९,

दिनांक २७.११.२०१९, दिनांक २८.०१.२०२१ व दिनांक २५.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये हिंगणघाट नगरपरिषदेस कळविले असून हिंगणघाट नगरपरिषदेकडून पुढील परिपूर्ण प्रस्ताव अद्याप प्राप्त झाला नसल्यामुळे पुढील निर्णय होऊ शकलेला नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेअंतर्गत पथदिवे बदलण्याच्या कंत्राटामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३३) * २१५६४ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील पारंपारीक पथदिवे (सोडीयम व्हेपर, मेटल लाईड, ट्युब लाईट्स व सि.एफ.एल. इत्यादी) ऐवजी एल.ई.डी. पथदिवे तसेच निकामी केबल्स बदलण्याचे ४७० कोटी रुपयांचे कंत्राट सन २०१६-१७ मध्ये वा त्या दरम्यान देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंत्राटमध्ये खरेदी करण्यात आलेल्या एका एल.ई.डी. लाईटची बाजारात ४ हजार रुपये किंमत असतांना सदर लाईट्स ९,९९०.०० रुपयांमध्ये खरेदी करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी इतक्या मोठ्या प्रमाणात एल.ई.डी. लाईट खरेदीमध्ये तफावत असतांना देण्यात आलेल्या कंत्राटाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नागपूर शहरात असलेले १,२६,००० (+) पारंपारित पथदिवे, ऊर्जा कार्यक्षम अशा एल.ई.डी. पथदिव्यांनी बदलणे, संपूर्ण पथदिव्यांच्या यंत्रणेचे मजबुतीकरण, आधुनिकीकरण स्थगीत प्रदानाच्या अभिनव पध्दती (deferred payment) ०७ वर्षेपर्यंत भुगतान प्राप्त करण्याच्या अटीवर परफॉर्मस गॅरंटीसह, संपूर्ण पथदिव्यांच्या यंत्रणेची कंत्राटाच्या कालावधीत देखभाल व दुरुस्ती करणे या यासह झोनवाईज रुपये ४७२ कोटी रकमेचे कंत्राट विविध आठ कंत्राटदारांना जानेवारी, २०१७ मध्ये देण्यात आलेले आहे.

(२) व (३) सदर कंत्राटामध्ये बुध्दीमान एल.ई.डी. पथदिवे (Intelligent LED Streetlight) असून, उदा. ३७ वॅट चे एल.ई.डी. पथदिवे सायंकाळी ६ वाजता सुरु झाल्यानंतर पथदिव्यांच्या कंट्रोलरमधून कोणतेही सिग्नल देण्याची -ट्रिगर करण्याची आवश्यकता न भासता स्वत: २३ वॅटचा होण्याची क्षमता असलेले (म्हणजेच ४०% ने ऊर्जा वापर कमी होणारे) व तद्नंतर रात्री १२ वाजता स्वत: १८ वॅटचा होण्याची क्षमता असलेले (म्हणजेच ५०% ने ऊर्जा वापर कमी होणारे) असे आहेत.

या निविदेच्या स्पेसिफिकेशननुसार, फक्त नागपूर मनपाकरिता अंतरराष्ट्रीय स्तराच्या उत्पादकाने तयार केलेले व संपूर्ण पथदिव्याच्या यंत्रणेतून विजेच्या चोरीला आळा बसण्याकरिता सतत १५० व्होल्ट वर वापर करण्यायोग्य असलेले त्याचप्रमाणे १२० व्होल्ट ते २७० व्होल्ट वरही वापर करण्यायोग्य असलेल्या पथदिव्यांची खुल्या बाजारात रु.४००० किंमत आहे, हे खरे नाही.

नागपूर मनपातर्फे देण्यात आलेल्या कंत्राटामध्ये पुरवठा करण्यात येणारे एल.ई.डी. पथदिवे खुल्या बाजारात रु.३४००/- इतक्या किंमतीला बाजारात उपलब्ध आहेत, असे आरोप करण्यात आले होते. हे दस्तऐवज मा.उच्च न्यायालयाने सुमोटो जनहित याचिकेच्या स्वरुपात दाखल करुन घेतले होते.

या जनहित याचिकेमध्ये झालेल्या सुनावणीअंती, रु.३४००/- इतक्या दरावर उपलब्ध असलेले एल.ई.डी. पथदिवे नागपूर मनपातर्फे देण्यात आलेल्या कंत्राटदामध्ये अंतर्भूत  असलेल्या उत्कृष्ट गुणवत्तेच्या पथदिव्यांशी तुलनायोग्य नाहीत, असे स्पष्ट झालेले आहे.

त्याचप्रमाणे पथदिव्याकरिता कोणत्याही रकमेचे एकाचवेळी नागपूर मनपातर्फे भुगतान करण्यात येत नसून, कंत्राटदारांनी दिलेल्या रकमेचे ८४ ई.एम.आय. रुपाने भुगतान करण्यात येत असून, ३७ वॅटच्या दिव्याकरिता माहे रु.२००.३५ पैसे दरमहा या दराने ८४ महिने भुगतान करावयाचे आहे, ही वस्तुस्थिती आहे.

या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या संदर्भात, मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.७८/२०१८ व सुमोटो दाखल केलेली जनहित याचिका क्र.७९/२०१८, मध्ये मा.उच्च न्यायालयाने, दोन्ही याचिका खारिज केलेल्या आहेत व महानगरपालिकेच्या बाजूने निर्णय दिलेला आहे.

या दोन्ही याचिकांच्या निकालपत्रातील अ.क्र.३६ मध्ये मा.उच्च न्यायालयाने स्पष्टपणे खालील मत नोंदविले आहे.:-

३६ : Once we find that the requirements of NMC have been worked out by an expert in a manner most conductive to public interest and different from one looked into in news item, the inevitable inference is the contention that the NMC pays Rs.९९९०/- for LED lamp costing of Rs.३४००/- in market is unacceptable.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुलुंड पूर्व (मुंबई) येथील न्यू पीएमजीपी वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(३४) * २१७११ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड)** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड पूर्व (मुंबई) येथील न्यू पीएमजीपी वसाहतीचा पुनर्विकास प्रकल्प करार सन २००१ पासून सुरू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुनर्विकास प्रकल्पातील १३९९ सभासदांपैकी ७८९ सभासदांना घरे मिळालेली असून अद्यापही ६१० सभासद घरांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सभासदांकरीता बांधलेल्या संक्रमण शिबिरांची दुरवस्था झालेली असून पावसाळ्यात गंभीर स्थिती निर्माण होत असल्यामुळे शासनाने याबाबत चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर पुनर्विकास प्रकल्प लवकर पूर्ण व्हावा तसेच सभासदांना वेळेवर भाडे मिळावे याकरिता म्हाडातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) सदर पुनर्विकास प्रकल्प सन - २००९ पासून सुरू झालेला आहे.

(२) म्हाडा कॉलनी न्यू पी.एम.जी.पी., मुलुंड (पूर्व) या वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पात सन-२०१६ मध्ये ७६९ सभासदांना सदनिका वितरीत करण्यात आल्या आहेत. संस्थेतील ६९८ सभासदांना अद्यापपर्यंत घरे मिळणे बाकी आहे.

(३) सदरहू प्रकल्पाच्या संक्रमण शिबीराची दि .०६.१०.२०१८ रोजी प्रत्यक्ष पाहणी म्हाडाकडून करण्यात आलेली असून सदरहू संक्रमण शिबीरामध्ये आवश्यक त्या दुरूस्ती करण्याकरीता विकासक मे.रिचा रिअल्टर्स यांना दिनांक ०६.१०.२०१८ व दिनांक १०.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये म्हाडामार्फत निर्देश देण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने विकासकाने त्यांच्या दिनांक १३.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर संक्रमण शिबीराची देखभाल व दुरूस्ती त्यांच्यामार्फत वेळोवेळी करण्यात येत असल्याचे म्हाडा कार्यालयास कळविले आहे.

(४) व (५) मंडळातर्फे संस्था व विकासक यांना दि.१०.१२.२०२० रोजी कारणे दाखवा नोटीस दिली असून, पुनर्विकास प्रकल्प सुरू होऊन लवकरात लवकर पूर्ण होण्याकरिता शासनस्तरावर व म्हाडा स्तरावर अनेकदा संयुक्त बैठका घेण्यात आलेल्या आहेत. तसेच सभासदांना भाडे देण्याबाबत विकासकास अवगत करण्यात आले आहे. विकासकाने दि.२३.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार फेब्रुवारी-२०२१ पर्यंत सभासदांचे २८ महिन्यांचे घरभाडे देणे प्रलंबित असून, पुनर्वसनाच्या इमारतींचे काम सुरू झाल्यावर टप्पा-टप्प्याने घर भाडे देण्यात येईल असे कळविले आहे.

-----------------

## सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेअंतर्गत घणसोली, खारघर, द्रोणागिरी, कळंबोली व तळोजा या परिसरातील घरांचा ताबा लाभार्थ्यांना दिला नसल्याबाबत

**(३५) * २५५३७ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम**

**(घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेअंतर्गत दिनांक १५ ऑगस्ट, २०१८ रोजी घणसोली, खारघर, द्रोणागिरी, कळंबोली व तळोजा या परिसरात सुमारे १४८३८ घरांची योजना जाहीर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरांचा ताबा माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान देण्यात येणार होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना संकट काळात देखील सिडकोने लाभार्थ्यांकडून पाचव्या आणि सहाव्या हप्त्यांची वसुली मे व जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली असुन ज्यांनी वेळेत हप्ते भरले नाहीत त्यांना मोठ्या रकमेची दंड आकारणी देखील केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बहुतांशी लाभार्थ्यांनी बँकांकडून कर्ज घेतले असून त्यांचे हप्ते सुरु झाले असतानाही सिडकोकडून घरांचा ताबा अद्यापही देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार उक्त योजनेतील लाभार्थ्यांना घरांचा ताबा किती दिवसात देण्याचे नियोजित केले आहे, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) कोरोना च्या कालावधीत लाभार्थ्यांना भरावयाच्या ५ व्या व ६ व्या हप्त्यांवरील विलंब शुल्क माफ करण्यात आले आहे.

तसेच ज्या लाभार्थ्यांनी विलंब शुल्काची रक्कम भरलेली आहे अशा लाभार्थ्यांची रक्कम उर्वरित देय रकमेमध्ये समायोजित करण्याचे सिडकोमार्फत प्रस्तावित आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) कोरोना या महामारीमुळे सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेंतर्गत प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झालेला आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पाचे काम वेगाने सुरु असून लाभार्थ्यांना घराचा ताबा जुन/जुलै-२०२१ पर्यंत देण्याचे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र. १ कर्जत (जि. रायगड) यांच्या गैरकारभाराबाबत

**(३६) * २५३९० श्री.चिमणराव पाटील (एरंडोल), श्री. रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र. १ कर्जत (जि. रायगड) यांनी मुख्य अभीयंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग कोकण यांचेकडून एकच जावक व एकच जॉब क्रमांकाने अनेक पुलांच्या दुरुस्तीची अनेक अनावश्यक असलेली एक कोटी रुपयांची सात कामे तसेच आणखी एक कोटी रुपयांची आठ कामे अशा दोन कोटी रुपयांच्या कामांना माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान मुख्य अभियंता कार्यालयातील अभिलेख्यात नोंद न करता मंजूरी मिळवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपअभियंता यांनी "सार्वजनिक बांधकाम विभागातील उल्लेखनिय कामगिरी बाबत" सन २०१९ करिता देण्यात येणा-या वैयक्तिक पुरस्कारासाठी मुख्य अभियंता यांचेमार्फत शासनास खोटी व दिशाभूल करणारी लेखी माहिती देऊन शासनाची फसवणूक करुन स्वयं प्राप्त करुन घेतलेला पुरस्कार रद्द करण्याचा प्रस्ताव पुराव्यासह क्षेत्रीय स्तरावरील वरिष्ठ अधिका-यांनी माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वावोशी (ता.खालापुर, जि.रायगड) येथील अंतर्गत रस्ता (B१/HO/६१२/१६-१७ dt २२/२/२०१७) करण्याच्या कामाची निविदा सदर उप अभियंता यांनी स्वत:ची मुलगी श्रीमती प्रियंका सर्वगोड यांचे निविदेचे दर सर्वात कमी नसतानासुध्दा शासनाचे नुकसान करुन महा.सार्वजनिक बांधकाम नियम क्र.२०८ चे उल्लंघन करुन कोणतीही प्रारंभिक अनामत रक्कम न घेता उप अभियंता यांनी कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) करुन घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीनूसार शासनाची फसवणूक करणा-या सदर उपअभियंता यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) सदर बाब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण कार्यालयाच्या स्तरावरुन तपासण्यात येत आहे.
(२) सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या अहवालावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(३), (४) व (५) या प्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांनी दि.१२.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये समिती गठीत केली असून सदर समितीकडून चौकशी सुरु आहे.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या “जायका” प्रकल्पाबाबत

**(३७) * २४८४४ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.चंद्रकांत जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील मुठा नदीचे प्रदूषण कमी करणे आणि शहरात निर्माण होणाऱ्या शंभर टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेने १ हजार कोटी रुपयांच्या “जायका” प्रकल्पाचे काम हाती घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पांतर्गत शहरात ११ ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी महानगरपालिकेकडून एक वर्षापूर्वीच निविदा काढण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निविदा जादा दराने असल्याचे सांगत महानगरपालिकेने त्यावर निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जायकाबरोबर झालेल्या करारातील अनेक अटींचे पालन केले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, हा प्रकल्प शहरासाठी गरजेचा असल्याने त्याचे तातडीने नियोजन करण्याबाबत तसेच या प्रक्रियेला विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) • पुणे महानगरपालिकेमार्फत जायका प्रकल्पांतर्गत वारजे, वडगांव (बुद्रक) आणि मुंढवा येथे सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येत आहे.

• सदर योजना रु. ९९०.०० कोटी एवढ्या रकमेची असून प्रकल्प रकमेच्या ८५% एवढा केंद्र शासनाकडून व पुणे महानगरपालिकेस १५% खर्च करावा लागणार आहे.

• सदर प्रकल्पातील कामे १० पॅकेजमध्ये करण्याचे निश्चित केले होते. त्यापैकी पॅकेज ३, ४, ५, ६ व ८ साठी डिसेंबर २०१८ अखेर निविदा मागविल्या होत्या.

• प्राप्त निविदांचा दर बाजारभावापेक्षा जास्त दराने आल्याने निविदा मूल्यमापन समितीच्या दि. १६/०८/२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर प्राप्त निविदा रद्द करुन फेरनिविदा मागविणेबाबत जायका / एनआरसीडी यांना कळविण्यात यावे असा निर्णय झाला.

• तसेच निविदा मूल्यमापन समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने जायका / एनआरसीडी यांस वेळोवेळी दिनांक ०७/११/२०१९, दिनांक २५/११/२०१९ व दिनांक ०९/०३/२०२० रोजी पत्राने कळविले होते.

• तद्नंतर पुणे महानगरपालिकेने दि. ३१/०८/२०२० रोजी पॅकेज क्र. ३, ४, ५, ६ व ८ यांच्या प्राप्त निविदा रद्द करुन प्रकल्पाचे संपूर्ण रिपॅकेजिंग करणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव जायका / एनआरसीडीकडे सादर केला होता.

• त्यास जायकाने दि. ३०/०९/२०२० रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार नव्याने निविदा मागविणेबाबत पुढील कार्यवाही सुरु असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे-सोलापूर महामार्गावरील इंदापूर-वरकुटे बुद्रुक (जि.पुणे) व साडे-शेलगांव (ता.करमाळा, जि.सोलापूर ) या रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(३८) * २५५३२ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सोलापूर महामार्गावरील इंदापूर-वरकुटे बुद्रुक (जि.पुणे) सदर रस्ता पुणे-सोलापूर महामार्गाला जोडला असुन या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्याने वाहन चालक व नागरिकांना प्रवास करणे अडचणीचे झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साडे-शेलगांव (ता.करमाळा, जि.सोलापूर ) या रस्त्याचीही अत्यंत दुरवस्था झाली असून सदर रस्ता वाहतूकीसाठी अयोग्य झाला आहे. तसेच सदर रस्ता करमाळा शहरास जोडला आहे. तथापि या रस्त्याने प्रवास करणे वाहन चालक व नागरिकांना त्रासदायक झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून इंदापूर-वरकुटे बुद्रुक (जि.पुणे) व साडे-शेलगांव (ता.करमाळा, जि.सोलापूर) या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू रस्त्याच्या दुरुस्तीचे काम केव्हा पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत सदर रस्त्याच्या डांबरी पुष्ठभागावरील खड्डे भरून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवला आहे

(३) प्रश्नांकित इंदापूर-वरकुटे बुद्रुक (जि.पुणे) रस्ता राम-६५ वरुन वरकुटे गाव प्रजिमा १२७ असा आहे. वरकुटे बुद्रुक हे कि.मी. ८/४०० मध्ये वसलेले आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग ६५ पासून वरकुटे गावाची लांबी प्रजिमा १२७ चा विचार करता कि.मी. ६/०० ते ८/४०० एवढी आहे. या लांबीतील साखळी क्र. ६/०० ते ७/०० कि.मी. या लांबीत नुतनीकरणाचे काम मार्च २०२० मध्ये पुर्ण झाले आहे. उर्वरीत साखळी क्र.७/०० ते १४/०० कि.मी. या लांबीत विशेष दुरुस्ती कार्यक्रमा अंतर्गत काम प्रगतीपथावर आहे.

तसेच साडे शेलगांव (ता.करमाळा, जि.सोलापूर) रस्त्याच्या एकुण ४.८०० कि.मी. लांबीमध्ये द्विवार्षिक देखभाल दुरुस्ती कार्यक्रमा अंतर्गत खड्डे भरुन वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर व यवतमाळ जिल्हयातील कोरपना-वनोजा-वणी व गडचांदूर-वनोजा-वणी या मार्गांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३९) * २२६४७ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना-वनोजा-वणी व गडचांदूर-वनोजा-वणी हा यवतमाळ जिल्हयातील वणी येथे जाण्यासाठी कोरपना, जिवती व राजुरा (जि.चंद्रपूर) येथील रहिवाशांसाठी प्रवासाचा अत्यंत जवळचा मार्ग असून या मार्गाची दुरवस्था झाल्यामुळे अपघातांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्यांच्या डांबरीकरण/सिमेंट कॉंक्रीटकरण/ दुरुस्तीसाठी त्या भागातील लोकप्रतिनिधी तसेच जागरूक नागरिकांनी माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम), राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम), जिल्हाधिकारी (चंद्रपूर/यवतमाळ), कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग, गडचांदूर) यांना लेखी निवेदनाद्वारे मांगणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे रस्ते सुस्थितीत असतांना ६० किमी अंतर प्रवास करण्यास केवळ ४५ मिनिट लागत असतांना आता गडचांदूर ते वणी येथे पोहचण्यासाठी सुमारे २ तास इतका वेळ लागत असून नागरिकांनाही प्रवास करणे अडचणीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरपना-कोडशी-वणी हा मार्ग एशियन डेव्हलपमेंट बँकेकडे प्रस्तावित असून नव्याने काम प्रस्तावित केले आहे, परंतु कोरपना-वनोजा-वणी व गडचांदूर - वनोजा - वणी या रस्त्याचे मजबुतीकरण करण्याबाबतच्या प्रस्तावावर अद्यापही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करून शासनामार्फत कोरपना-वनोजा-वणी व गडचांदूर-वनोजा-वणी या रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) कोरपना-वनोजा-वणी व गडचांदूर-वनोजा-वणी या रस्त्याची चंद्रपूर जिल्ह्यातील लांबी सुस्थितीत असून सदर रस्त्याच्या यवतमाळ जिल्ह्यातील लांबीमध्ये रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे अंशत: खरे आहे. परंतू रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघाताच्या संख्येत वाढ झाली ही बाब खरी नाही.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
सदर विषयाबाबतचे निवेदन माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०२० मध्ये दिले आहे.
(३), (४) व (५) विषयांकित रस्त्याच्या यवतमाळ जिल्ह्यातील लांबीमध्ये वणी येथे पोहचण्यासाठी वेळ लागत असल्याचे अंशत: खरे आहे. यवतमाळ जिल्ह्यातील रस्त्याच्या चारगाव शिरपूर कळमना (रामा-३१७) किमी १८२/१०० ते २०४/५०० चे काम केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत मंजूर असून निविदेचे काम प्रगतीत आहे. तसेच वेळाबाई फाटा ते कुरई ढाकोरी बोरी रस्ता (रामा-३७४) किमी ०/०० ते ९/०० या रस्त्यासाठी AMC Non Plan अंतर्गत जॉब मंजूर असून रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील वनोजा ते गडचांदूर (२०.२० किमी) व कोडशी ते कोरपना (९.००किमी) लांबी सुस्थितीत असून वाहतूकीस योग्य आहे. कोरपना-कोडशी-शिंदोला फाटा या रस्त्याचे काम एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या अर्थसहाय्यांतर्गत प्रस्तावित असून सदर प्रस्तावावर कार्यवाही प्रगतीत आहे
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील ४४३ अतिधोकादायक इमारतींमधील कुटुंबांना संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्याबाबत

**(४०) * २३३२८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत पावसाळ्यापूर्वी घेण्यात आलेल्या आढाव्यात ४४३ इमारती अतिधोकादायक असल्याचे दिनांक २९ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आढाव्यात महानगरपालिका, शासकीय आणि खाजगी इमारतींची संख्या किती आहे तसेच सदरहू अतिधोकादायक इमारती रिक्त करुन तेथील नागरिकांना जवळच्या संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू अतिधोकादायक ४४३ इमारतींच्या यादीमध्ये इमारत क्र.१२०-१२४, शेखभाई बिल्डिंग, शिवदास चापसी मार्ग, मुंबई-९ या उपकर प्राप्त इमारतींचा समावेश करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, सदरहू इमारतीतील ७० कुटुंबांना इमारत रिक्त करुन संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करण्याची नोटीस महानगरपालिका-म्हाडाने बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार महानगरपालिकेने धोकादायक घोषित केलेल्या इमारतींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) दिनांक ११.०५.२०२० पर्यंत झालेल्या सर्वेक्षणानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या ५२, शासकीय २७ व खाजगी ३६४ अशा एकूण ४४३ इमारती अतिधोकादायक (सी-१) प्रवर्गातील असल्याचे आढळून आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अधिसुचित केलेल्या सी-१ प्रवर्गातील अतिधोकादायक व असुरक्षीत इमारतींबाबतच्या मार्गदर्शक सुचनेनुसार, महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना महानगरपालिकेमार्फत स्थलांतरीत करुन त्या इमारती निष्कासित करण्यात येतात. तसेच खाजगी इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांच्या बाबतीत संबंधित मालक / विकासक किंवा त्यांनी स्वत: पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे आहे.

(३) अतिधोकादायक ४४३ इमारतींच्या यादीमध्ये इमारत क्र.१२०-१२४, शेखभाई बिल्डिंग, शिवदास चापसी मार्ग, मुंबई-९ या उपकर प्राप्त इमारतींचा समावेश करण्यात आला नाही.

सदर इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांनी इमारतीचे संरचनात्मक परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करुन त्याबाबतचा अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केला होता. त्यानुषंगाने सदर इमारत धोकादायक असून, ती सी-१ प्रवर्गामध्ये मोडत असल्याने इमारतीतील भाडेकरु / रहिवाशांना त्वरीत स्थलांतरीत करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने म्हाडा प्राधिकरणास दिनांक २०.०८.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) संरचनात्मक परीक्षण अहवाल व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पत्राच्या अनुषंगाने म्हाडा प्राधिकरणामार्फत स्थळपाहणी करण्यात आली असून प्राधिकरणामार्फत इमारतीमधील भाडेकरु / रहिवाशांना गाळे रिक्त करुन संक्रमण शिबीरामध्ये स्थलांतरीत करण्यासाठी कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) व (६) म्हाडा प्राधिकरणाच्या पॅनल वरील वास्तुशास्त्रज्ञांनी स्थळपाहणी करुन सदर इमारतीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक प्राधिकरणास सादर केले आहे. त्यानुषंगाने अंदाजपत्रकांची छाननी करुन इमारतींच्या दुरुस्तीकरीता लागणाऱ्या PCL वरील अतिरिक्त रक्कमेचा भरणा करण्याकरीता प्राधिकरणामार्फत इमारत मालक / भाडेकरु / रहिवाशी यांना कळविण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने घोषित केलेल्या ४४३ अतिधोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतींपैकी ७३ इमारती रिक्त करण्यात आल्या आहेत. उर्वरित ३७० इमारतींपैकी १४४ प्रकरणे न्यायप्रविष्ठ, १४ प्रकरणे तांत्रिक सल्लागार समितीकडे प्रलंबित आहेत. तसेच ३९ इमारतींमध्ये जलजोडणी व विद्युत जोडणी खंडीत करण्यात आली असून, १७ प्रकरणांमध्ये चटईक्षेत्र मोजणे, विद्युत व जलजोडणी खंडीत करणे इत्यादीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## अकोला जिल्हयातील तेल्हारा-गांधीग्राम रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाबाबत

**(४१) * २४३३५ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील तेल्हारा-गांधीग्राम रस्त्याच्या दुरूस्तीचे (रा.मा,.२७९ व रा.मा.२७८) बांधकाम हॅम (एचएएम) अंतर्गत करण्यात येत असून कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १६ मार्च,२०१९ रोजी वा त्या सुमारास कंत्राटदारास देण्यात आला असून काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक १५ मार्च, २०२१ रोजीपर्यंत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाच्या पूर्णत्वाचा कालावधी १५ मार्च २०२१ रोजी पर्यंत असतांना माहे ऑक्टोबर, २०२० अखेर २० कि.मी मधील फक्त रस्ता खोदकाम रुंदीकारणासाठी GSB १५ कि.मी. इतकेच काम करण्यात आले असून संपुर्ण कामापैकी सुमारे २५ टक्केच काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याचे पूर्ण रुंदीत व खंडित लांबीत केलेले खोदकाम रस्त्याचे बांधकाम रखडल्याने / तसेच ठेवल्यामुळे रस्ता वाहतुकीस गैरसोयीचा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदर रस्त्याचे काम कंत्राटदाराकडून नियोजनबद्ध व गुणवत्तापुर्वक करून घेण्याच्या दृष्टिने सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला यांचेतर्फे कंत्राटदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, सदर रस्त्याचे काम किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून वेळोवेळी खबरदारी घेण्यात आली आहे.

(४) उद्योजकाने पहिल्या माईलस्टोनचे साध्य वेळेस पुर्ण न केल्यामुळे स्वतंत्र अभियंता यांनी दिलेल्या अहवालानुसार व त्यांचे पत्र क्र.Infra.Ekam/IE/HAM-८३A/२०२०/१२६/dt. १९/०५/२०२० नुसार करानाम्यातील अट क्र.१२.३.१ नुसार Performance Security (५% म्हणजेच रुपये ५,६९,८५,०००/-) च्या ०.१% प्रतिदिन दराप्रमाणे दंडात्मक नुकसान भरपाई आकारण्यात आली. त्यानुसार दिनांक ११/१२/२०१९ ते दि. १८/०५/२०२० पर्यंत (१५९ दिवस) प्रतिदिन रुपये ५६,९८५/- प्रमाणे एकूण रुपये ९०,६०,६१५/- ची नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे दिनांक १९/०५/२०२० ते दिनांक १५/०२/२०२१ आजपर्यंत (२७२दिवस) एकूण रु. १,५४,९९,९२०/- ची नुकसान भरपाई आकारण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे मजास, न.भू.क्र. १६०, जोगेश्वरी (मुंबई) येथील इंदिरा नगर सहकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४२) * २३७८२ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मजास, न.भू.क्र.१६०, जोगेश्वरी (मुंबई) येथील इंदिरा नगर सहकारी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार ९८७ झोपडीधारक पात्र ठरविण्यात आले त्यापैकी केवळ ३७७ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले असून उर्वरीत ६१० झोपडीधारकांचे पुनर्वसन अद्यापही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुनर्विकास प्रकल्प अनेक वर्षांपासून प्रलंबित असून सदरहू प्रकल्पाच्या उर्वरीत बांधकामाकडे विकासककाकडून जाणिवपूर्वक विलंब करण्यात येऊन संबंधित विकासक व शासकीय अधिकारी/कर्मचारी संगनमताने कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींचे बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे असून इमारतींच्या उंचीसाठी आवश्यक असणारे सिविल

एविएशनची परवानगी संबंधित विकासकाने न घेतल्याने या इमारतींमधील पाच मजल्यावरील दोन मजले अनधिकृत घोषित करून ते निष्कासित करण्यासाठी नागरी उड्डाण प्राधिकरणाने शासनास सूचना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातील गैरव्यवहाराविरोधात झोपडीधारक व रहिवाशी यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र पोलीस यांना निवेदन देवून या प्रकरणी तपास व चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार झोपडीधारकांची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित विकासकांवर कारवाई करण्यात येऊन पात्र झोपडीधारकांना हक्काची घरे मिळवून देण्यासाठी सदर पुनर्वसन प्रकल्प म्हाडाच्या माध्यमातून अथवा अन्य इच्छूक विकासकाकडून पूर्ण करून घेण्याबाबत तसेच निष्कासित केलेल्या झोपडीधारकांना प्रलंबित भाडे मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) हे खरे आहे.
(२) सदर पुनर्वसन प्रकल्पाच्या कामात प्रगती दिसून येत नसल्यामुळे संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांनी शिखर तक्रार निवारण समितीकडे अर्ज दाखल केलेला होता. त्यावर समितीने दि.०९.०१.२०२० च्या आदेशान्वये विकासक मे.टायनवाला बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांची नियुक्ती रद्द केलेली आहे. त्याविरोधात विकासकाने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. त्यानुषंगाने मा.उच्च न्यायालयाने सदर बाबतीत पुर्नसुनावणी घेण्याचे आदेश शिखर तक्रार निवारण समितीस दिले होते.

शिखर तक्रार निवारण समिती यांनी दि.०५.०२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये विकासकाची नियुक्ती रद्द करुन नवीन विकासकाची नियुक्ती करण्याची मुभा संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेस दिलेली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.

अर्जदार श्री.सुदेश रघुनाथ गायकवाड यांनी सदरहू प्रकल्पातील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याकरीता महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना दि.१३.१२.२०१९ रोजी अर्ज केला होता. सदरचा अर्ज महासंचालक कार्यालयाकडून अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाही करण्याकरीता पाठविण्यात आलेला आहे.

(५) सदर बाबतीत विकासक मे.टायनवाला बिल्डर्स ॲण्ड डेवहलपर्स यांची नियुक्ती शिखर तक्रार निवारण समिती यांनी दि.०५.०२.२०२१ रोजीच्या आदेशानव्ये रद्द केलेली असून सहकारी गृहनिर्माण संस्थेस दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये विकासकाची नियुक्ती करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरची (जि.गडचिरोली) तालुक्यातील कोरची ते मयालघाट रस्त्याचे बांधकाम करणेबाबत

**(४३) * २५०६१ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची (जि.गडचिरोली) तालुका मुख्यालयापासुन २५ कि.मी. अंतरावरील मयालघाट या गावात जाण्यासाठी रस्ताच उपलब्ध नसल्याने रस्त्याअभावी नागरीकांना शिक्षण, आरोग्य व अन्य शासकीय सुविधांपासुन वंचीत रहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ च्या पहील्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून कोरची ते मयालघाट रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

(२) मयालघाट हे कोरची तालुक्यातील गाव असून गट ग्रामपंचायत मुरकुटी अंतर्गतचे गाव आहे. सदर क्षेत्र नक्षलग्रस्त अति संवेदनशील भागात येते.

सदर गावाला जाण्याकरिता मौजा मसेली येथे राष्ट्रीय महामार्गाशी -

१) मसेली मुरकुटी मयालघाट इतरिजल्हा मार्ग क्र.५ व २) पडयालजोग डाबरी मसेली कोटरा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१०० असे दोन पर्यायी रस्ते आहेत.

१) मसेली मुरकुटी मयालघाट इतर जिल्हा मार्ग क्र.५ - या रस्त्याची एकूण लांबी १३.७० कि.मी.आहे. सदर रस्त्याची कि.मी.०/०० ते ५/०० लांबी खडी, कि.मी.५/०० ते ८/०० डांबरी व कि.मी.८/०० ते १३/७०० लांबी खडी पृष्ठभागाची आहे.

सदर रस्त्यामुळे बोंडे, नवेझरी, आंबेखारी, मुरकुटी व मयालघाट ही गावे जोडली जातात.

२) पडयालजोग डाबरी मसेली कोटरा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१०० - या रस्त्याची एकूण लांबी ११.३० कि.मी.आहे.सदर रस्त्याची ०/०० ते ७/०० लांबी खडी पृष्ठभागाची आहे. सदर रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.५ ला आंबेखारी गावाच्या पुढे सा.क्र.९/४०० वर सुरु होवून मसेली येथे राष्ट्रीय महामार्गावर मिळतो. कि.मी.९/४०० ते ११/३०० मधील खडीकरण काही प्रमाणात उखडलेले आहे.

सदर रस्त्यामुळे बेलारगोंदी, डाबरी, पडयालजोग, मुरकुटी व मयालघाट ही गावे जोडली जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (पूर्व) येथे ओव्हरब्रिज किंवा सॅटीस प्रकल्प राबविणेबाबत

**(४४) * २३८१० श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व)** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पूर्व) शहराचा मोठ्या प्रमाणात होत असलेला विस्तार, दिवसेंदिवस वाढत असलेली लोकसंख्या बघता कल्याण स्टेशनकडून कल्याण पूर्वेला येण्यासाठी एकही उड्डाणपुल सध्या अस्तित्वात नसल्याने स्टेशनपासून नागरिकांना सामान उचलून स्कायवॉकद्वारे पायी चालावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण पूर्वेला एमएमआरडीएच्या माध्यमातून स्टेशन जवळ ओव्हरब्रिज अथवा ठाणे रेल्वे स्टेशन प्रमाणे किमान चार चाकी वाहने थेट जाऊ शकतील असा सॅटीस प्रकल्प राबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ मार्च, २०२० रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन सादर करून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनानूसार स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच शहरातील नागरिकांची मागील अनेक वर्षांपासूनची मागणी लक्षात घेता तातडीने निर्णय घेऊन ओव्हरब्रिज किंवा सॅटीस प्रकल्प राबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्प (एम.यु.आय.पी.) अंतर्गत विविध कामांबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्राप्त निवेदने संकलित करुन त्याचा प्रस्ताव तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्यांच्या प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येते. त्यानुसार प्रस्तुत निवेदनाबाबत प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच सॅटीस प्रकल्पाची कार्यवाही संबंधित महानगरपालिकेमार्फत होणे अपेक्षित आहे.

यापुर्वी या विषयाबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने कल्याण स्थानकानजिक पुर्व -पश्चिम जोडणाऱ्या अतिरिक्त मार्गाचे नियोजन कल्याण पूर्व रेल्वे भूखंड विकास प्रकल्पांतर्गत करणेबाबत कल्याण-डोंबिवली महापालिकेकडून विभागीय रेल व्यवस्थापक (कार्य) मध्य रेल्वे, मुंबई यांना त्यांच्या दिनांक ३.११.२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

-----------------

## अहमदनगर शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४५) * २५१४७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून, रस्त्यावर खड्डे पडले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी तेथील नागरिकांनी अनेकवेळा आंदोलने मोर्चे काढले असून, रस्त्याची कायमस्वरुपी दुरुस्ती न करता केवळ पंचिंगवरच कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करण्यात येऊन पंचिंग ठेकेदार यातून बरेच गैरप्रकार करीत असून, एबी रजिस्टर मधील नोंदी व प्रत्यक्ष कामे यामध्ये फार मोठ्या प्रमाणात तफावत असून, मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अहमदनगर शहरात मागील वर्षाच्या तुलनेत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्यामुळे रस्त्यांवर काही ठिकाणी खड्डे पडले होते. तसेच, अमृत भुयारी गटार योजना व फेज-२ पाणी पुरवठा योजनेची कामे सुरु असल्याने मध्यवस्तीतील रस्ते मोठ्या प्रमाणात खोदण्यात आले होते.
(२) हे खरे नाही.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत रस्ते दुरुस्तीसाठी केलेल्या कामानुसार प्रत्यक्ष मोजमाप घेऊन रु.२४,७३,२९६/- खर्चाची देयके तयार करण्यात आली आहेत. तसेच, एम.बी. रजिस्टरमधील नोंदी व प्रत्यक्ष कामे यामध्ये तफावत नसल्याचे अहमदनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) अहमदनगर महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या कामाबाबत महानगरपालिकेकडे कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर शहर (जि.चंद्रपूर) महानगरपालिकेतील पाणीपूरवठा विभागाकडून दुरुस्तीच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येत असल्याबाबत

**(४६) * २३८८१ श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहर (जि.चंद्रपूर) महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागाकडून दुरुस्तीच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च केले जात असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महानगरपालिकेच्या अधिका-यांकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दुरुस्तीच्या नावाखाली होत असलेल्या गैरव्यवहाराला प्रतिबंधीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) चंद्रपूर शहरासाठी सन १९७६ मध्ये सुरु झालेली पाणीपुरवठा योजना, महापालिकेकडील अपुऱ्या मनुष्यबळाअभावी सन २०११ पासून पुढील १० वर्षाकरिता खाजगी कंत्राटदारास विहित निविदा प्रक्रियेद्वारे चालविण्यासाठी देण्यात आलेली होती.

तथापि, कंत्राटदाराचे असमाधानकारक काम, वाढत्या तक्रारी यामुळे, कंत्राटाची मुदत संपण्याअगोदरच, महापालिकेने सदरचे कंत्राट दिनांक ०८/११/२०१९ रोजी रद्द करुन, चंद्रपूर शहर पाणी पुरवठा योजनेचे कार्यचालन, महापालिकेने स्वत:कडे घेतले आहे.

सदरची योजना अत्यंत जुनाट झालेली असल्याने, वारंवार पाणीपुरवठा गळती होण्याचे प्रमाण बरेच आहे. पाणीपुरवठा सुरुळीत सुरु राहण्याची आवश्यकता लक्षात घेता, माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१९ या कालावधीत देखभाल दुरुस्तीसाठी रु.३२,३५,८०९ इतका खर्च झालेला आहे.

तसेच पाणीपुरवठा सुस्थितीत राहण्यासाठी मोठ्या व छोट्या स्वरुपाच्या जुन्या पाईपलाईन वर आजअखेर २२७४ गळत्या दुरुस्ती, ४७८ व्हॉल्वच्या दुरुस्त्या, कॉंक्रीट ब्रेकर, डिवॉटरींग पंप तसेच इतर आवश्यक कामे करण्यात आलेली आहेत. यापोटी एकूण रु.१,६९,९२,८२२/- इतका खर्च झालेला आहे.

चंद्रपूर शहरासाठी अस्तित्वातील पाणीपुरवठा योजना अत्यंत जुनी असल्याने, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानातंर्गत, चंद्रपूर शहरासाठी रु.२३४.९५ कोटीची योजना प्रगतीपथावर असून, आजअखेर या योजनेतील ८५% कामे पूर्ण झालेली असून, सदरची योजना टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

-----------------

## राज्यातील प्राचीन मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**(४७) * २०६२७ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राचीन मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचा शासनाने दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राचीन मंदिराचे संवर्धन योजनेसाठी शासनाने सन २०२१-२२ या वर्षासाठी अर्थसंकल्पात सुमारे १०१ कोटी रुपयांची तरतुद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राचीन मंदिराचे जतन व संवर्धन योजनेची अंमलबजावणी संस्था म्हणून राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सोपविण्यात आली असून या योजनेचे स्वरूप ठरविणे, कोणती कामे प्राध्यान्याने घ्यावीत व त्या कामाचा तपशील आदि ठरविण्यासाठी शासनाकडून बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यांची समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर समितीची बैठक लवकरच घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी, हिंगोली, बसमत येथे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु असलेल्या हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गतच्या विकास प्रकल्पांबाबत

**(४८) * २४८९१ श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात हायब्रिड ॲन्युईटी विकास प्रकल्पांतर्गत विविध खात्यामार्फत वेगवेगळे विकास प्रकल्प राबविण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतला असून त्यानुषंगाने वेगवेगळ्या जिल्ह्यात विविध विकास प्रकल्प राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी, हिंगोली, बसमत मतदार संघात सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत उमराफाटा (कळमनुरी) ते आसेगाव (ता.बसमत), नांदेड सिमा हद्दीपर्यंत व झिरोफाटा ते नागेशवाडी फाटा अशी दोन रस्त्यांची कामे दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संपूर्ण राज्यातंर्गत राज्याची एकच निविदा प्रक्रिया असून एकाच विभागाकडून रुपये १०० कोटीपेक्षा अधिक रक्कमेची निविदा राबवून आपल्या मर्जीतील मोठमोठ्या कंपन्यांना निविदा देण्यात आल्याचे तसेच शासनाचे वहन आदेश मिळताच अनामत रक्कमेची तरतूद ठेवून त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पाचे नियोजन, रेखांकन, सर्वेक्षण व अंदाजपत्रक याबाबत एकच निविदा एजन्सी धारकाने तयार करून त्यानुसार सदरहू रस्त्याचे केवळ सर्वेक्षण व प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सुमारे रुपये एक लाख प्रति कि.मी.दराने भोपाळ येथील कंपनीला निविदा देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुसार दोषी आढळणा-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर काम हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गतच्या प्रचलित पद्धतीद्वारे जिल्हा स्तरापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंतच्या वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देवून तसेच संकेतस्थळावरही निविदा सूचना प्रसिद्धी देवून स्पर्धात्मक खुल्या निविदा बोलविण्यात आल्या व त्यापैकी निम्नत्तम देकार सादर करणाऱ्या निविदाकाराची निविदा शासन स्तरावरील जलसंपदा विभाग,वित्त विभाग,नियोजन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग या चार विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या निविदा समितीद्वारे पुर्ण विचारांती स्विकारण्यात आली. त्यामुळे मर्जीतच्या कंपन्यांना निविदा देण्यात आल्याची बाब वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

(४) हे खरे नाही.

मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, पुणे यांचे मार्फत हिंगोली

जिल्ह्यातील हायब्रिड ॲन्युईटीच्या तीन कामांसह राज्यातील सर्व हायब्रिड ॲन्युईटीच्या कामांसाठी वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देवून तसेच संकेतस्थळावरही निविदा सूचना प्रसिद्धी देवून स्पर्धात्मक खुल्या निविदा बोलविण्यात आल्या व त्यापैकी निम्नत्तम देकार सादर करणाऱ्या निविदाकाराची निविदा निश्चित करुन विहित निविदा प्रक्रिया पुर्ण केली. हिंगोली जिल्ह्यातील हायब्रिड ॲन्युईटीच्या तीन कामांच्या एकूण १८६.१० कि.मी. लांबीचे सर्वेक्षणासाठी रुपये ४१६.९० लक्षाची Infrastruture Deveolpment Corporation (Karnataka) Ltd यांच्या निविदेस मंजूरी प्रदान केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील टिळकनगर (चेंबूर) येथील महालक्ष्मी पॅलेस को.ऑप.हौ.सोसायटी या संस्थेच्या विकासक व माजी अध्यक्षांनी अटी व शर्तीचा भंग केल्याबाबत

**(४९) * २४३६७ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील टिळकनगर (चेंबूर) येथील महालक्ष्मी पॅलेस को.ऑप.हौ.सोसायटी (एन.डी.आर.-२७) या संस्थेला शासनाच्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई ने १० टक्के सदनिका म्हाडाला (शासन नामनिर्देशित सदस्यांना) तसेच २० टक्के सदनिका अनुसूचित जाती-जमातीतील व्यक्तिंना देण्याच्या शर्तीवर दिनांक ५ सप्टेंबर, २००१ रोजी वा त्या सुमारास भूखंड दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर विकासक व माजी अध्यक्ष यांनी अटी व शर्तीचा भंग करुन मागासवर्गीय व्यक्तिंना तसेच म्हाडा/शासनास सदनिका न देता त्याची परस्पर विक्री करुन शासनाची करोडो रुपयांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने

मा. गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे दिनांक ८ जुलै, २०२० रोजी वा त्या सुमारास तक्रार अर्ज सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) टिळकनगर (चेंबूर) येथील महालक्ष्मी पॅलेस को.ऑप.हौ.सोसायटी (एन.डी.आर-२७) या संस्थेला शासनाकडून विनियम-१६ अंतर्गत निवासी वापराकरिता भूखंडाचे वितरण करण्यात आलेले आहे.

तद्नंतर मुंबई मंडळाकडून सदरहू संस्थेला दि.२१/१२/२००२ रोजीच्या पत्रान्वये विनियम-१६ अंतर्गत वाटप केलेल्या भूखंडाचे आवश्यक ते शुल्क भरणा करण्याकरिता कळविण्यात आलेले आहे. सदर पत्रामधील अनु.क्र.१३ मध्ये संस्थेच्या सभासदांपैकी २० टक्के सभासद मागासवर्गीय व भटक्या, विमुक्त, अनुसुचित जाती / जमातीचे असणे अनिवार्य आहे, असे नमुद आहे. तथापि, १० टक्के सदनिका म्हाडाला (शासन नामनिर्देशित सदस्यांना) देण्याबाबतची अट नमुद नाही.
(२) सहायक भू-व्यवस्थापक, कुर्ला यांनी दि.०८/०४/२००३ रोजीच्या पत्रान्वये संस्थेने मंडळाच्या नियमाप्रमाणे सादर केलेल्या सभासदांच्या यादीमधून २१ पात्र सभासदांची यादी उपनिबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था, मुंबई मंडळ यांना सादर केलेली आहे. सदर यादीनुसार टिळकनगर (चेंबूर) येथील महालक्ष्मी पॅलेस को.ऑप.हौ.सोसायटी यांनी मंडळासोबत भाडेपट्टा करारनामा दिनांक ११/०९/२००३ रोजी अंमलात आणलेला आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष यांच्या दि.२७/०७/२०२० रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने म्हाडाकडून दि.०१/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यांत आलेला आहे.

-----------------

## लातूर जिल्ह्यातील अहमदपूर-लातूर हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग

## प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आल्याबाबत

**(५०) * २५१०३ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर)** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील अहमदपूर-लातूर हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान वर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन सुध्दा सदर रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ७ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास नांदेड येथील राष्ट्रीय महामार्ग कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यावरुन ट्रॅक्टर व ट्रक याद्वारे ऊस वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असून या रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे अपघाताच्या संख्येत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण** : (१) लातूर जिल्ह्यातील अहमदपूर-लातूर राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ रस्त्याचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील आहे.

हे खरे आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.

(२) हे खरे आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.

(३), (४) व (५) अहमदपूर-लातूर या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ वरील औसा ते चाकूर व चाकूर ते लोहा पॅकेज अंतर्गत केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रस्तावित असलेल्या चौपदरीकरणाच्या प्रकल्पांतर्गत समाविष्ट आहे.

सदर चौपदरीकरणाच्या प्रकल्पाकरीता कंत्राटदार मे.एमईपी लॉग जियान,

मुंबई यांची नियुक्ती होऊन सदर कंपनीस दि.२५.०३.२०१९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तथापि, सदर काम कंत्राटदाराने सुरु केले नसल्यामुळे सदर रस्त्यावर वेळोवेळी पडलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती सद्यस्थितीत कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व खर्चाने प्राधिकरणाकडून अन्य ठेकेदारांची नियुक्ती करुन करण्यात आली आहे.

तसेच सदर ठिकाणी प्रस्तावित असलेले चौपदरीकरणाचे काम देखील लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन असून त्याकरिता केंद्र शासनामार्फत कंत्राटदार मे.एमईपी लॉग जियान यांच्याऐवजी बदली करार करण्याबाबतची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.तरी सदर प्रक्रिया पूर्ण होताच चौपदरीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,नांदेड यांनी कळविले आहे.

-----------------

## भिवंडी-वाडा-मनोर या महामार्गाला जोडणा-या कुडूस-कंचाड रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(५१) * २४६५२ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-वाडा-मनोर या महामार्गाला जोडणा-या रस्त्याच्या कुडूस-कंचाड रस्त्याच्या दुरुस्तीकरिता दीड कोटी रुपये खर्च करुनही सदरहू काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असून दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने शासनाने ठरवलेल्या अंदाजपत्रकानुसार व निकषानुसार काम न करता माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निकृष्ट दर्जाची खडी टाकल्याने पावसाळ्यात सर्व खडी उखडायला लागून रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे सदरहू रस्ता कुडूस, भावेघर,

खानिवली, आंबिस्ते, आपटी, देवळी, वावेघर, कंचाड या आदिवासी भागातून जात असून शासनाचा सर्व निधी वाया गेला असल्याचे स्थानिक नेते यांनी पालकमंत्र्याकडे व अप्पर मुख्य सचिव यांचेकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषी कंत्राटदार व कंत्राटदारांचे हित जपणा-या भ्रष्ट अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

कंत्राटदाराने अंदाजपत्रकाप्रमाणे काम केलेले आहे.

(३) व (४) निवेदने प्राप्त झाली आहेत. त्याअनुषंगाने दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडून सदर कामाची पाहणी करण्यात आली असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्याबाबत

**(५२) * २४०४९ श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) येथील औद्योगिक वसाहतीमुळे शहरात दररोज हजारो छोट्या-मोठ्या वाहनांची ये-जा असून, माल वाहतूक करणारे ट्रक उभे केले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी औरंगाबाद शहर येथे सुमारे २४ एकर जागेवर ट्रान्सपोर्ट हब उभारण्याचा निर्णय गत ४ वर्षांपूर्वी घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात ट्रान्सपोर्ट हब उभारण्याच्या दृष्टीने अद्याप कोणतीही

कार्यवाही झाली नसल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार औरंगाबाद शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्याकरिता ट्रान्सपोर्ट हब उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) • औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीकरीता मंजूर झालेल्या विकास योजनेअंतर्गत हर्सूल परिसरातील जमिनीवर औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीचे आरक्षण असून, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आरक्षणातील वाहतुकनगर हा एक भाग आहे.

• औरंगाबाद शहरात चिखलठाणा औद्योगिक वसाहत ही मुख्य औद्योगिक वसाहत असून, ती वाहतुकनगरच्या प्रस्तावित जागेपासून अंदाजे एक किलोमीटर अंतरावर आहे.

• औरंगाबाद शहरातील जड वाहनांची वाहतूकीची समस्या सोडविण्याकरिता बाजार संकुलात २५ एकर जमीन क्षेत्रावर वाहतूकनगर विकसित करण्याचे महानगरपालिकेने प्रस्तावित केले होते.

(३) व (४) • तथापि, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे जाधववाडी हर्सूल भागासाठी २०.४७ हेक्टर क्षेत्राचे वाहतुकनगर (Transportnagar) साठी आरक्षण ठेवण्यात आले आहे.

• आरक्षित क्षेत्रापैकी १० एकर इतक्या क्षेत्राची जागा Transportnagar साठी औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीकडे आगाऊ रक्कम रु.२० लक्ष भरणा करुन जागेचा ताबा महानगरपालिकेने घेतला आहे.

• औरंगाबाद महानगरपालिकेकडे अंशत: जागेचा ताबा असला तरी प्रस्तुत जागेला पोच रस्ता उपलब्ध नव्हता.

• सद्यस्थितीत औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रस्तावित वाहतुकनगरपर्यंत पोच रस्ता उपलब्ध झालेला असून, वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी वाहतुकनगरचे काम महानगरपालिकेमार्फत त्वरीत हाती घेण्यात येईल, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणा व नागपूर (ग्रामीण) (जि.नागपूर) तालुक्यातील सुमारे ४००० पेक्षा जास्त कुटुंबियांना घरकुलाचा लाभ मिळाला नसल्याबाबत

**(५३) * २४७७७ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणा व नागपूर (ग्रामीण) (जि.नागपूर) तालुक्यातील सुमारे ४००० पेक्षा जास्त कुटुंबियांना घरकुलाचा लाभ मिळण्याकरिता लोकप्रतिनिधी यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांना दिनांक २८ डिसेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अभावी संभाव्य लाभार्थ्यांना जागा व सद्य:स्थितीत घरांची पाहणी व तपासणी थांबविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदर प्रधानमंत्री आवास योजना घटक-४ विकास आराखडा १, २ व ३ मधिल लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ व अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) सदर पत्र महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास (म्हाडा) प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत घराची पाहणी व जागा पाहणी करण्याची प्रक्रिया घरकुल बांधणी प्रकल्प प्रस्ताव (DPR) मंजूर होण्यापूर्वी केली जात असल्यामुळे निधी अभावी काम थांबले आहे, हे खरे नाही.

(३) हिंगणा व नागपूर (ग्रामीण) क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत घटक क्र.४ करीता एकूण ५६७२ घरकुलांसाठी केंद्र हिश्श्याचा रु.१८४.८० लक्ष व राज्य हिश्श्याचा रु.१९३६.२० लक्ष असा एकूण रु.२१२१.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिंचवली-गोहे (ता.खालापूर,जि.रायगड) येथील पुलावर अनेक खड्डे

**पडल्यामुळे पुल वाहतुकीसाठी धोकादायक झाला असल्याबाबत**

**(५४) * २०५७३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचवली-गोहे (ता.खालापूर,जि.रायगड) येथील पुलावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे पुल वाहतुकीसाठी धोकादायक झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खालापूर तालुक्यातील चिंचवली-गोहे, आक्तकर गाव, आडोशी व इतर गावांच्या दळणवळणासाठी अनेक वर्षापूर्वी चिंचवली-गोहे येथे पुल बांधण्यात आला असून पावसाळ्यात सदर पुलावरून प्रवास करणे अपघात होण्यास कारणीभुत ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून चिंचवली-गोहे येथील पुलाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही, सदर पूल अरुंद असून, अद्यापपर्यंत प्रश्नांकित पुलावरुन अपघात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्नांकित पूलाच्या दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बागमांडला (ता. श्रीवर्धन, जि.रायगड) आणि बाणकोट (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या दरम्यानच्या खाडीवरील सागरी सेतूच्या प्रलंबित कामाबाबत

**(५५) * २०७४३ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागमांडला (ता. श्रीवर्धन, जि.रायगड) आणि बाणकोट (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या दरम्यानच्या खाडीवर वरळी सी लिंकप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सागरी महामार्गावरील महत्वाकांक्षी सागरी सेतू बांधण्याचे काम सन २०१३ साली सुरु करण्यात आले असून अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३ साली सुरु करण्यात आलेल्या या सागरी सेतू प्रकल्पाचा अंदाजित खर्च रुपये २०० कोटी इतका असून सन २०१५ अखेरपर्यंत सदरहू पूलाचे बांधकाम पूर्ण होणे अपेक्षीत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामाची सद्य:स्थिती काय आहे व सदर कामास अद्यापपर्यंत किती खर्च करण्यात आला आहे तसेच सन २०१५ अखेरपर्यंत काम पूर्ण न होण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या पूलामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक सुलभ होणार असून रत्नागिरी- रायगड या कोकणातील जिल्ह्यासह गोव्याला जाण्यासाठीचे अंतर कमी होऊन स्थानिक पर्यटनाला वाव मिळुन रोजगारातही वाढ होणार असल्यामुळे सदर सागरी सेतूचे प्रलंबित काम विनाविलंब पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) श्रीवर्धन, जि.रायगड-बाणकोट खाडीवरील सागरी सेतू बांधण्याच्या कामास अद्यापपर्यंत एकूण रु.१२७.५३ कोटी इतका खर्च झाला आहे. ठेकेदाराच्या आर्थिक अडचणींमुळे सदर काम संथगतीने चालू होते.

सदर पुलाचे बांधकाम दि.१३/०४/२०१८ पासून पूर्णत: बंद असून निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम पुन:श्च सुरु करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते व आरक्षण विकसित करण्यासाठी महानगरपालिकेने भूसंपादन केलेल्या जमिनीबाबत

**(५६) * २११४६ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते व आरक्षण विकसित करण्यासाठी महानगरपालिकेने भूसंपादनाची कोणतीही कार्यवाही न करता सन २००४ मध्ये जमिनी ताब्यात घेतल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्ता व आरक्षणासाठी ताब्यात घेतलेल्या जमिनीच्या भूधारकांना टीडीआर स्वरूपात मोबदला देण्यासाठी कलम ३७ अन्वये प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने दिनांक २८/०१/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे टी.डी.आर. विषयक नविन विनियम मंजूर केला आहे व तो राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या नियमावलीत अंतर्भुत केला असून सदर विनियम पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसही लागु करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नविन विनियमातील तरतुदी विचारात घेवून महानगरपालिकेच्या स्तरावर उचित निर्णय घेवून सदर प्रकरणी कार्यवाही करणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यांसाठी व आरक्षणासाठी महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या जमिनीचा मोबदला टीडीआर स्वरूपात भूधारकांना देण्याबाबतच्या शासनाकडे मंजूरीकरिता आठ वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२), (३), (४), (५) व (६) मंजूर विकास योजनेतील नियोजित रस्ता / रस्ता रुंदीकरणाबाबत प्रत्यक्ष जागेवर विकसनाचे काम झालेल्या क्षेत्राचा मोबदला टी.डी.आर. स्वरुपात अनुज्ञेय करण्याविषयी, पिंपरी-चिंचवड शहराच्या तत्कालीन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.एन २.३ व एन २.४.३ मध्ये सुधारणा करण्याबाबत, पिंपरी-चिंचवड महापालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वयेचा प्रस्ताव दि.०३.०८.२०१२ रोजी मंजूरीस्तव सादर केला होता. यानंतर शासनाने दि.२८.०१.२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे टी.डी.आर. विषयक नविन विनियम मंजूर करुन तो राज्यातील सर्व महापालिकांच्या नियमावलीत अंतर्भुत केला होता. सदर विनियम पिंपरी-चिंचवड महापालिकेसही लागु होता. या विनियमातील तरतुदी विचारात घेवून महापालिकेच्या स्तरावर उचित निर्णय घेवून कार्यवाही करणे अपेक्षित होते.

आता शासनाने दि.०२.१२.२०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांकरिता (काही अपवाद वगळता) तसेच प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केली असून ती दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे. सदर नियमावली पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसही लागू झाली आहे. सदर नियमावलीतील टी.डी.आर. विषयक तरतुदी स्वयंस्पष्ट असून सदर तरतुदी विचारात घेवून महापालिकेच्या स्तरावर उचित निर्णय घेवून कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने वरळी, येथे भाडेपट्टयाने जागा दिलेल्या स्पोर्ट्स क्लबने करारभंग करून महानगरपालिकेची केलेली फसवणूक

**(५७) * २५५२२ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने वरळी, मुंबई येथील ७० हजार ३७६ चौ.मी. जागा ९९ वर्षांच्या भाडेपट्टयाने एका स्पोर्ट्स क्लबला स्टेडिअम, जलतरण तलाव व बॅडमिंटन हॉल, इ. क्रीडा सुविधांसाठी सन १९९३ मध्ये वा त्या दरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू स्पोर्ट्स क्लबने महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता या जागेवरील स्टेडियमधील खेळासाठी वापरावयाचे बंदिस्त मैदान व इतर निर्दिष्ट क्षेत्राच्या प्रचालन आणि व्यवस्थापनासाठी प्रतिवर्ष १२ टक्के वाढीसह वार्षिक व्यवस्थापन शुल्क रूपये १७ कोटी ७३ लाख रूपयांचा करार एका व्यवसाय संस्थेसोबत माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४ ते २०१८ या कालावधीत सदरहू स्पोर्ट्स क्लबने व्यवस्थापन शुल्कापोटी जवळपास ६४ कोटी रुपये मिळविले व त्या मिळकतीचा ३३ टक्के हिस्सा म्हणजेच जवळपास २१ कोटी रूपये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग न करता महानगरपालिकेची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१३-२०१९ या कालावधीत उपरोक्त जागेवर आयोजित करण्यात आलेल्या ३२३ कार्यक्रमांपैकी ३१५ कार्यक्रम (जवळपास एकूण कार्यक्रमांच्या ९८ टक्के) हे क्रीडा व्यतिरिक्त कार्यक्रम असून त्यापोटी स्पोर्ट्स क्लबने जवळपास १ कोटी ५० लाख रूपयांचे उत्पन्न मिळविले व या कार्यक्रमांकरिता महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता आयोजित केलेले असल्याने ही बाब जमीन वाटप प्रकरणी करण्यात आलेल्या कराराचा भंग करणारी आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केलेल्या तपासणीत सदरहू स्पोर्ट्स क्लबने इमारत परिसरातील मंजूर आराखडयाच्या विपरित अनधिकृत बांधकाम करून वापरात बदल केला होता, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहू प्रकरणी संबंधित स्पोर्ट क्लबने महानगरपालिकेची फसवणूक करून केलेला करारभंग पाहता सदरहू जागा संबंधित स्पोर्ट्स क्लबकडून काढून घेवून ती पुन्हा शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत तसेच महसुली नुकसानाची जवळपास २१ कोटी रूपयांची रक्कम संबंधित स्पोर्टस क्लबकडून वसूल करुन दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) भारतीय नियंत्रक व महालेखापरिक्षक विभागाने केलेल्या लेखापरिक्षणानुसार, सन २०१४ ते सन २०१८ या कालावधीत मे. सिनेयुग या संस्थेने तसेच माहे एप्रिल २०१४ ते डिसेंबर २०१९ या कालावधीत विविध व्यावसायिक संस्थांद्वारे नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया यांस प्राप्त झालेल्या रकमेपैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेस देय ३३% हिश्याची (१८% दंडनीय व्याजासहित) रु. १०१.१० कोटी इतक्या रकमेचा भरणा बृहन्मुंबई महानगरपालिकेस करणेबाबत महानगरपालिकेमार्फत दिनांक २४.१२.२०१९ रोजी मागणी पत्र बजावले आहे.

तथापि नॅशनल स्पोर्टस क्लब या संस्थेने मागणी पत्रातील रकमेवर हरकत घेतली असून, त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने आयोजित केलेल्या सुनावणीत, नॅशनल स्पोर्टस क्लबने मागणीपत्रातील काही मुद्दयांबाबत कायदेविषयक हरकत घेतली असून त्यावर विधी विभागाच्या सल्ल्यानुसार अंतिमत: देय ठरणारी रक्कम दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत भरण्याची अंतिम मुदत नॅशनल स्पोर्टस क्लब या संस्थेस देण्यात येणार असून, मक्तेदाराने देय रक्कम विहित मुदतीत न भरल्यास मक्तेदाराविरुध्द पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) मक्ता करारातील तरतुदीप्रमाणे क्रिडा कार्यक्रमासाठी आवश्यकता नसतांना क्रिडा व्यतिरिक्त कार्यक्रम गुणवत्तेनुसार व अधिमूल्य भरणेसापेक्ष आयुक्तांच्या परवानगीने करण्याची मुभा आहे.

माहे एप्रिल, २०१३ ते नोव्हेंबर २०१९ या कालावधीत सदर स्पोर्टस क्लबमार्फत ३५८ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यापैकी क्रिडा विषयक १० व क्रिडा व्यतिरिक्त ३४८ कार्यक्रमांचे (एकूण कार्यक्रमांच्या ९७%) आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमांपोटी नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडियाला अंदाजे रु. ४.५८ कोटी इतके उत्पन्न मिळाले असून, त्यापैकी ३३% म्हणजेच रु. १.५२ कोटी इतकी रक्कम व रु. ३०.६४ लाख इतक्या १८% दंडात्मक व्याज अशा एकूण १.८३ कोटी इतक्या रकमेचा भरणा बृहन्मुंबई महानगरपालिकेस करण्यात आला आहे.

(५) हे खरे आहे.

(६) व (७) नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडियाने मक्ता करारातील अटीभंगाबाबत महानगरपालिकेने मक्तेदारास बजावलेल्या ब्रीच नोटीसच्या अनुषंगाने दिनांक ०३.०२.२०१८ रोजी उपायुक्त (सुधार) यांच्या अधक्षतेखालील बैठकीमध्ये पुढील कारवाईची रुपरेषा निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार अनधिकृत बांधकामे व वापरातील बदल याविरोधात कारवाई हाती घेण्यात आली आहे.

त्यानुसार नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडियाने केलेल्या अनधिकृत बांधकामांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये निष्कासनाची नोटीस व वापरातील बदल याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावण्यात आली होती.

सदर नोटीशीस अनुसरुन अंतिम निष्कासन आदेशाविरुध्द सदर क्लबने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४७ अन्वये अपील दाखल केले असून, सदर अपील निकाली काढण्याचे संकल्पीत आहे.

सद्य:स्थितीत मागील ११ महिन्यांपासून नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया येथे कोविड सेंटर उभारण्यात आले आहे.

-----------------

## विमानतळ प्राधिकरणाच्या अंतर्गत फनल झोनमध्ये असलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(५८) * २११८८ श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विमानतळ परिसरातील इमारती या ५० वर्षाहून अधिक काळापासून अस्तित्वात असून अनेक इमारतींची दूरवस्था झाली असून काही इमारती मोडकळीस आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमानतळ प्राधिकरणाच्या अंतर्गत फनल झोनमध्ये असलेल्या इमारतींच्या उंचीवर निर्बध घातल्यामुळे इमारतींचा विकास प्रलंबित असून अनेक इमारती अतिधोकादायक झाल्या असून रहिवासी जीव मुठीत घेऊन तेथे राहत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील इमारती दोन ते तीन मजल्यांच्या असून उंचीची मर्यादा असल्याने या इमारतींना लागू करण्यात आलेल्या चटई क्षेत्रफळात या इमारतींचा पुनर्विकास शक्य नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर एअरपोर्ट रनवे फनेलमध्ये येणा-या इमारतींना पुनर्विकास करताना अतिरिक्त एफएसआय व टीडीआरचा लाभ मिळण्यासाठी प्रारूप विकास नियंत्रण नियमावली सन २०३४ मध्ये शासन विशेष तरतूद करणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार रहिवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व इमारतींच्या विकासाबाबत शासनाने कोणते धोरण अवलंबिलेले आहे , तसेच महानगरपालिकेने इमारतींच्या पुनर्विकासाबाबत नगर विकास विभागास पाठविलेल्या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने पावसाळ्यापुर्वी केलेल्या सर्वेक्षणानुसार विमानतळालगतच्या परिसरामध्ये अत्यंत धोकादायक व मोडकळीस आलेल्या एकूण ४४३ इमारती असल्याचे आढळून आले असून मुंबई विमानतळावर उतरणाऱ्या व उड्डान करणाऱ्या विमानाच्या फनेल झोनमध्ये एकूण १७७ इमारती अतिधोकादायक आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३), (४), (५) व (६) बृहन्मुंबई महानगरपालिकेची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०३४ शासनाने दि.८/०५/२०१८ रोजी मंजूर केली आहे. त्यामध्ये विनियम ४५(ब) समाविष्ट असून त्यानुसार विमानतळ परिसरातील उंचीच्या निर्बंधामुळे जर विनियम ३०(अे)(३)(सी) नुसार मुळ चटई निर्देशांक अनुपयोजीत असल्यास त्याबाबतचा टि.डी.आर. देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तथापी विनियम ३०(अे)(३)(सी) ची तरतूद शासनाने मंजूरीमधून प्रलंबित ठेवली आहे. विमानतळ फनेल झोनमधील इमारतींचे पुनर्विकासाकरीता येणाऱ्या अडचणीचे निवारण करणे बाबत स्थानिक लोकप्रतिनीधी तसेच नागरीक यांचे विविध पत्रे प्राप्त झाली आहेत. त्यानुसार फनेल झोन क्षेत्राचे पुनर्विकासाचे अनुषंगाने महानगरपालिकेने एक समिती स्थापन केली. या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून त्यावर संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय घेण्यात आले असून प्रस्तावावर शासन नगर विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यातून जाणा-या सागरी महामार्गाच्या प्रारूप आराखड्यास केंद्र शासनाची मंजुरी मिळणेबाबत

**(५९) * २४२२३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यातून जाणा-या सुमारे ५७० कि.मी. लांबीच्या सागरी महामार्गाचे पेव्हड शोल्डरसह उन्नतीकरण करण्याकरिता प्रत्यक्ष तसेच ड्रोन कॅमेऱ्याद्वारे सर्वेक्षण करण्यात येवून या कामाचा प्रारूप आराखडा माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रारूप आराखड्याला केंद्र शासनाकडून मंजुरी मिळाली आहे काय, मंजुरी मिळाली असल्यास या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, प्रारूप आराखड्याला अद्याप मंजुरी मिळाली नसल्यास राज्य शासनाकडून याबाबत कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रारूप आराखड्यास अद्यापपावेतो केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झालेली नाही.
(३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. खाक्षेस-२०२०/प्र.क्र.२६६/रस्ते-८ दिनांक ३०.०९.२०२० अन्वये सदर सागरी महामार्गाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास हस्तांतरीत करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. या सागरी महामार्गाचे दुपदरीकरण/चौपदरीकरण पेव्हड शोल्डरसह उन्नतीकरण करण्यासाठी सदरील प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत “अंशदान ठेव” तत्वावर हाती घेण्यासाठी दि.१४.०१.२०२१ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या पायाभूत विकास समितीच्या बैठकीत मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडाळा (मुंबई) येथील भारवाहक तळावर बांधण्यात आलेल्या गाळयांच्या वाटपात/हस्तांतरणात झालेली अनियमितता

**(६०) * २०५३३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वडाळा भारवाहक तळ टप्पा क्र. १ येथे बॉम्बे गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशन (बीजीटीए) महासंघ यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीमधील गाळे वाटप/हस्तांतरणात मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमतता झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित सोसायट्यांनी प्राधिकरणाची पूर्व परवानगी न घेता व हस्तांतरण शुल्क न भरता गाळे हस्तांतरीत केलेले आहेत, अशा प्रकारचे हस्तांतरण हे अनोंदणीकृत दस्तांच्या आधारे आवश्यक ते मुद्रांक शुल्क न भरता झाले असल्याचे निष्पन्न झाले असल्यामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसुल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाबाबत प्राधिकरणाकडे असंख्य तक्रारी प्राप्त झाल्यामुळे प्राधिकरणामार्फत अपर जिल्हाधिकारी-२ (मेट्रो) श्री श्रीधर डुबे-पाटील यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली होती व सदर चौकशीचा अहवाल दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. आयुक्त, एमएमआरडीए यांना सादर करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालानुसार मा. आयुक्त यांनी वडाळा भारवाहक तळावर गाळे वाटप/हस्तांतरणात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असून, पोलीस विभाग, मुद्रांक शुल्क कार्यालय, मुद्रांक शुल्क अंमलबजावणी कक्ष यांच्यासोबत सदर प्रकरणाबाबत पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले होते, त्यानुसार पोलीस विभाग, मुद्रांक शुल्क कार्यालय व मुद्रांक शुल्क अंमलबजावणी कक्ष यांनीही सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, बॉम्बे गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशन (बीजीटीए) महासंघ यांना दोन वेळा नोटीस देवूनही सदर नोटीसीवर प्राधिकरणामार्फत कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी मा. मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, आयुक्त एमएमआरडीए यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी स्वयंस्पष्ट निवेदन दिलेले आहे, त्यानुसार उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) • वडाळा भारवाहक तळ येथे बॉम्बे गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशन (बीजीटीए) यांना प्राधिकरणाच्या ठराव क्र.५०३ अन्वये भूखंड क्र.ए-२, बी-३, बी-४, के-१, के-२, जी-१, एफ-१, व ठराव ५४९ अन्वये के-३, भूखंड क्र. बी-६, बी-७, बी-८, ए-३. हया भूखंडांचे वाटप करण्यात आले. याबाबत त्यांचेशी दि.०७.०९.१९९५ रोजी १८ वर्षाकरीता भाडेपटटा करार करण्यात आला व दि.२५.०३.१९९६ रोजी या भूखंडांचा ताबा देण्यात आला.

• महाराष्ट्र ट्रक टेम्पो टॅंकर बस वाहतुक महासंघ यांना ठराव क्र. ५०२ अन्वये सी-१, सी-२, डी-१, इ-१, हया भूखंडांचे वाटप करण्यात आले. याबाबत त्यांचेशी दि.१९.०२.१९९७ रोजी १८ वर्षाकरीता भाडेपट्टा करार करण्यात आला व दि.१९.०२.१९९७ रोजी या भूखंडांचा ताबा देण्यात आला. तसेच, ठराव क्र.५४९ अन्वये एच-१, जे-१, जे-२, के-४ हे भूखंडांचे वाटप करण्यात आले आहेत. याबाबत त्यांचेशी दि.२७.०३.१९९७ रोजी १६ वर्षाकरीता भाडेपट्टा करार करण्यात आला व त्याच दिवशी सदर भूखंडांचा ताबा देण्यात आला.

• तसेच, मुंबई पुणे मोटार मालक श्रमजीवन प्रिमायसेस सहकारी संस्था यांना ठराव क्र. ५४९ अन्वये बी-५ या भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. याबाबत त्यांचेशी दि.१७.०१.२००७ रोजी २० वर्षाकरीता भाडेपटटा करार करण्यात आला व दि.२३.०१.२००७ रोजी या भूखंडाचा ताबा देण्यात आला.

• भाडेपट्टा करारानुसार बीजीटीए, महासंघ व मुंबई पुणे मोटार मालक श्रमजीवन प्रिमायसेस सहकारी संस्था यांनी त्यांच्या अधिनस्त सदस्यांच्या सोसायट्या तयार करुन त्यांना हे भूखंड देणे अपेक्षित होते.

• सदर प्रकरणी प्राधिकरणास गाळे वाटपात अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाने श्री.श्रीधुर डुबे, अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमली होती. सदर समितीने दिनांक १०.१०.२०१७ रोजी आपला चौकशी अहवाल सादर केला आहे. त्यानुसार सदर प्रकरणी खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. ज्या उद्देशाने हया योजनेची सुरुवात केली तो उद्देश सफल झाला नाही.

२. योजनेचे कार्यान्वयन अयोग्यरितीने करण्यात आले.

३.मालवाहतुक संघटनांनी त्यांच्या सदस्य सोसायटीच्या कामकाजाकडे दुर्लक्ष केले.

४. तक्रारदारांच्या तक्रारी त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव व संस्थेच्या अनियमित कामकाजाबाबत केलेल्या दिसतात.

चौकशी अधिकारी यांनी वरील बाबींचा विचार करुन वडाळा भारवाहक तळ टप्पा क्र.१ चे कार्यान्वयनात व गाळेवाटपात अनियमितता झाली असे नमूद केले आहे.

(४) सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर संयुक्त निबंधक, सहकारी संस्था, मुंबई; सचिव (सहकार) कृषी व सहकार विभाग; अतिरिक्त मुख्य सचिव (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग: मुंद्राक जिल्हाधिकारी, मुंद्राक जिल्हाधिकारी (अंमलबजावणी कक्ष-२) मुंबई तसेच मुंद्राक जिल्हाधिकारी नियंत्रक, मुंबई यांचे कार्यालय यांना विषयांकीत प्रकरणी पत्रव्यवहार करून वस्तुस्थिती अवगत करण्यात आली आहे व याबाबत सखोल चौकशी करण्याची विनंती केली आहे. याबाबत अद्याप संबंधितांकडून अहवाल प्राप्त झाला नाही.

(५), (६) व (७) प्राधिकरणामार्फत या अनियमिततेबाबत बॉम्बे गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशन (बीजीटीए), महासंघ व मुंबई पुणे मोटार मालक श्रमजीवन प्रिमायसेस सहकारी संस्था यांना ०३.०७.२०१८ व १६.०९.२०२० रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. सदर नोटीसीच्या अनुषंगाने, बॉम्बे गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशन (बीजीटीए) यांचेकडून अजतागयात ९८ प्रकरणी व मुंबई पुणे मोटार मालक श्रमजीवन प्रिमायसेस सहकारी संस्था यांचेकडून १० प्रकरणी विना परवाना हस्तांतरण नियमित करण्यासाठी प्रक्रियाशुल्कासह अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जांची छाननी करुन भाडेपट्टा करारातील अट क्र.३ (के) मधील तरतुदीनुसार प्राधिकरणामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) शहरातील गरीबाचा पाडा येथे आरक्षित भूखंडावर अनधिकृतपणे इमारतीचे बांधकाम होत असल्याबाबत

**(६१) * २५५३८ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) शहरातील गरीबाचा पाडा येथील अनमोल नगरीच्या प्रवेशद्वाराजवळ कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर अनधिकृतपणे सात मजल्यांच्या इमारतीचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड महानगरपालिकेच्या मालकीचा असून सदर भूखंडावर महानगरपालिकेने ४ लाख ५० हजार रुपयांचा खर्च केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या भूखंडांवर अनधिकृत बांधकाम होत असल्याच्या १५ पेक्षा अधिक तक्रारी महानगरपालिका प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील भूखंडासह तक्रारी असलेल्या अन्य भूखंडांवरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सदर भूखंडावर अनधिकृतपणे बांधकाम सुरू असल्याचे निर्दशनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) • सदर जागेवर सुरू असलेल्या अनधिकृत आर.सी.सी. बांधकामाबाबत प्राप्त तक्रारीस अनुसरून महानगरपालिकेच्या ७/ह प्रभागक्षेत्र कायार्लयामार्फत दि.१६.०२.२०२१ रोजी निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

• सन २०१५ ते ३१ डिसेंबर, २०२० अखेरपर्यंत कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत १०४५० अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत, तर ४१३ अनधिकृत बांधकामधारकांविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत गुन्हे दाखल केलेले आहेत.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द विहीत केलेल्या कार्यप्रणालीनुसार (S.O.P.) निरंतर कार्यवाही करण्यात येत,असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील शिवदास चापशी मार्ग येथील थॉवर मेन्शन पट्टा पुनर्विकास प्रकल्पात नागरीकांची झालेली फसवणुक

**(६२) * २३३३५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी)** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवदास चापशी मार्ग येथील थॉवर मेन्शन पट्टा विभागातील थॉवर मेन्शन नं.२, ३, ४ व शेखभाई बिल्डिंग, सकिना, प्रगती आदि सात जुन्या उपकरप्राप्त इमारतींमधील ३५० कुटुंबांना म्हाडा व महानगरपालिका यांचे उपस्थितीत पुनर्विकास योजनेची माहिती न देता दि नेस्ट जैन कंपनीच्या विकासकाने चाळीची मालमत्ता बँकेत गहाण ठेऊन प्रकल्प राबविण्याबाबत दिशाभूल करणारी माहिती करारपत्राद्वारे देऊन व भाडेकरुंची फसवणूक करुन संमती पत्रावर त्वरीत स्वाक्षरी घेऊन पुनर्विकासाचा प्रस्ताव परवानगीसाठी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान म्हाडास सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सात इमारतींमध्ये थॉवर मेन्शन नं.२ पवन सहकारी गृहनिर्माण संस्थेने (नियोजित) म्हाडा कायदा कलम १०३-ब अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली असल्याने सदर प्रकरणी विकासकाने सुप्रिम कोर्टातून मान्यता न घेता उक्त पुनर्विकास प्रकल्पास म्हाडाच्या काही अधिकाऱ्यांसोबत आर्थिक संगनमत करुन मान्यता घेण्याची कार्यवाही करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुनर्विकास प्रकल्पाची शासनाने उच्च स्तरावरून चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषी विकासकावर कारवाई करण्याबाबत तसेच म्हाडा कायद्यातील तरतुदी आणि मा.सर्वोच्च न्यायालयाची परवानगी विचारात घेता कायदेशीर व योग्य कार्यवाही करुन प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

शिवदास चापसी मार्ग येथील इमारत क्र.११४-११६, थॉवर मेन्शन न.३ व इमारत क्र.१०८-११२, थॉवर मेन्शन नं.४ या जुन्या उपकरप्राप्त इमारतींचा विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत पुनर्विकास करण्याबाबतचा प्रस्ताव मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास प्राप्त झाला आहे.

इमारत क्र.१२६-१३२, थॉवर मेन्शन नं.२, इमारत क्र.१२०-१२४, शेखभाई बिल्डिंग, इमारत क्र.१८०-१८८, सकीना या जुन्या उपकरप्राप्त इमारती व प्रगती ही पुनर्रचित इमारत यांच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास प्राप्त झालेला नाही.

(२) इमारत क्र.१२६-१३२, थॉवर मेन्शन नं.२ या इमारतीतील रहिवाशांनी १०३ (ब) अन्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने भूसंपादनाबाबत प्राथमिक कार्यवाही करणेबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.

तथापि, इमारत क्र.१२६-१३२, थॉवर मेन्शन नं.२ या इमारतीचा पुनर्विकास प्रस्ताव मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव ते पंढरपूर या पालखी मार्गावरील रस्त्याचे बांधकामाबाबत

**(६३) * २४३३७ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव ते पंढरपूर या ६५ किमी पालखी मार्गावरील रस्त्याचे बांधकाम एच.ए.एम (हॅम) अंतर्गत करण्यात येत असून कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास कंत्राटदारास देण्यात आला असून उक्त काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२१ रोजीपर्यंत होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपुर्ण कामापैकी माहे ऑक्टोबर, २०२० अखेर पर्यंत केवळ सुमारे ३० टक्केच काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम कंत्राटदाराकडून नियोजित वेळेत व गुणवत्तापूर्वक करून घेण्याकरीता करारनाम्यातील अटी-शर्ती नुसार अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,अकोला यांचेमार्फत कंत्राटदारावर प्रतिदिन दराप्रमाणे दंडात्मक नुकसान भरपाई ची किती रक्कम आकारण्यात आली आहे व किती वसूल करण्यात आली आहे,

(४) तसेच, याबाबत चौकशी करून सदर काम कालमर्यादेत पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच काम केंव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे,

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) होय.

(३) करारनाम्यातील अट क्र १२.३.१ नुसार रुपये १,८५,५००/- प्रतिदिनाप्रमाणे रुपये १,८५,५०,०००/- दंडात्मक नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे.

(४) सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर असून दिनांक ३१/०८/२०२१ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## जोगेश्वरी पूर्व (मुंबई) पूनम नगर येथे पंतप्रधान घरकुल प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेला पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(६४) * २३७८५ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी पूर्व (मुंबई) पूनम नगर येथील म्हाडाच्या जागेत पंतप्रधान घरकुल प्रकल्पा अंतर्गत उभारण्यात आलेल्या एकुण १७ इमारती अत्यंत धोकादायक झाल्या असून सदरहू इमारतींच्या पुनर्विकासाकरीता विकासकाची नियुक्ती करून १२ वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापपर्यंत या इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प रखडलेला आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदरहू पुनर्विकासाकरीता विकासकास आवश्यक असलेले देकारपत्र देऊनही विकासकाने म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे भरावयाचा शुल्काचा भरणा केलेला नसल्याने या पुनर्विकासाकरीता आवश्यक पुढील परवानग्या अद्याप प्राप्त झालेल्या नसून सदरहू पुनर्विकास प्रकल्प रखडलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांना दिनांक १७ जुलै, २०२० रोजी वा त्या सुमारास निवेदनपत्र सादर केले आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, सदरहू पुनर्विकास प्रकल्पास विकासकाकडून होत असलेला विलंब तसेच या इमारतींची झालेली दुरवस्था यामुळे इमारतींमधील रहीवाशांच्या जीवीतास असलेला धोका लक्षात घेता या रहीवाशांचे तातडीने सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करण्याबाबत तसेच सदरहू विकासकाकडून हा पुनर्विकास प्रकल्प काढून घेऊन म्हाडाच्या माध्यमातून सदरहू इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व तदनुसार सदरहू इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) ते (५) पी.एम.जी.पी.कॉलनी, पुनम नगर, व्हिलेज मजास, अंधेरी (पूर्व), मुंबई उपनगर येथील म्हाडाच्या एकूण १७ इमारतींचा पुनर्विकास करण्याकरीता मे.श्रीपती रियल व्हेंचर्स एल. एल.पी या विकासकाची नेमणूक केली होती. सदरहू विकासकाला उक्त इमारतींचा पुनर्विकास करण्याकरीता म्हाडाकडून दि.१३.११.२०१४, दि.०८.०७.२०१६ व दि.०५.०१.२०१८ रोजी असे तीन वेळा देकारपत्रे देण्यात आली. तसेच सदरहू विकासकास शासन पत्र, दि.१५.२.२०२० अन्वये, काही अटीं-शर्तीवर DCPR-२०३४ मधील वि.नि.नि.३३(५) नुसार ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक देखील मंजूर करण्यात आला.

तथापि, सदरहू दि.१५.२.२०२० रोजीच्या पत्रातील अटीं-शर्तीचे पालन उक्त विकासकाने केले नाही. विशेषत: विकासक हा सहकार, पणन, व वस्त्रोद्योग विभागाच्या दि.४.७.२०१९ च्या शासन निर्णयानुसार पुनर्विकास प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या २०% इतकी बँक गॅरन्टी देण्यास तयार नाही.

रहिवाशांचे हित अबाधित राखण्याच्या दृष्टीने बँक गॅरंटीची उपाययोजना महत्वाची आहे, असे मत म्हाडाने शासनास सादर केलेल्या त्यांच्या दि.१७.७.२०२० रोजीच्या अहवालामध्ये नमूद केले आहे.

प्रस्तुत प्रकल्पाचा पुनर्विकास रखडलेला असल्याने आणि सदरहू विकासक बँक गॅरंटी देण्यासही तयार नाही. तर सनदी लेखापाल तसेच वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्या अहवालानुसार, सदरहू विकासकाची योजना राबविण्यासाठी फंड कॅपॅसिटी एलएलपी ची कागदपत्रे दिसून येत नाहीत. यावरुन विकासकाची आर्थिकस्थिती व्यवस्थित नसल्याचे स्पष्ट होते.

सबब, म्हाडाने प्रचलित नियमातील तरतुदीनुसार मे. श्रीपती रियल व्हेंचर्स एल.एल.पी. या विकासकाची नेमणूक रद्द करुन, सदरहू प्रकल्पाचा पुनर्विकास म्हाडाने स्वत: करावा किंवा म्हाडामार्फत अन्य विकासकाची नेमणूक करुन सदरहू पुनर्विकासाचा प्रकल्प तातडीने पूर्ण करावा, अशा सूचना शासनपत्र, दि.१५.१२.२०२० अन्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदरहू शासन पत्राच्या अनुषंगाने म्हाडाने त्यांच्या दि.२८.०१.२०२१ च्या पत्रान्वये संबधित संस्था व विकासकास कळविले आहे.

-----------------

## नगर-मनमाड रस्त्याची झालेली दुरवस्था

**(६५) * २५१९३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी)** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर-मनमाड या रस्त्याची दुरवस्था झाली असून संबंधीत विभागाने या दुरवस्थेकडे जाणीपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे अपघाताचे प्रमाण व त्यात होणारी जिवीतहानी यामध्ये वाढ झाली असून याप्रकरणी लक्ष वेधण्यासाठी तेथील लोकप्रतिनिधींनी आंदोलनाचा इशारा दिल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी तेथील लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना या रस्त्याच्या दुरवस्थेचे व फोटो व व्हिडिओ सीडी पाठवलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार नगर-मनमाड रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) सन २०२० च्या पावसाळ्यातील अतिवृष्टिमुळे प्रश्नाधीन रस्ता क्षतिग्रस्त झाला होता. तथापि, क्षतिग्रस्त रस्त्यामूळे अपघाताचे प्रमाण व जीवीतहानी मध्ये वाढ झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अहमदनगर ते सावळीविहीर फाटा (NH-१६०, ७५ कि.मी.) या लांबीमध्ये रस्ता सुधारणाकामी रु. ४३०.११ कोटीं इतक्या रकमेच्या कामाची निविदा NHAI, अहमदनगर यांचेमार्फत दिनांक १२.०१.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सावळीविहीर फाटा ते कोपरगाव (NH-७५२-जी, १०.५०० कि.मी.) या लांबीच्या नुतनीकरण कामी रु. २१.०० कोटी कामाची निविदा दिनांक १०.१२.२०२० रोजी राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक यांचेमार्फत काढण्यात आली आहे. कोपरगाव-कोल्हार या लांबीत विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत रु.१०.७९ कोटी इतक्या रकमेच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरातील चिखलठाणा विमानतळ ते महावीर चौक रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(६६) * २४०९० श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरातील चिखलठाणा विमानतळ ते महावीर चौक रस्त्याचे काम माहे सप्टेंबर,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान ९ कोटी रुपये खर्च करून करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम दोन वर्षांपूर्वी केले असतानाही सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औरंगाबाद शहराची लाईफ लाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जालना रस्त्याचा एक भाग महावीर चौक ते नगरनाका रस्ता अत्यंत महत्वाचा असून सदर रस्त्यावर अनेक खड्डे पडले आहेत त्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधित प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे, तसेच चिखलठाणा विमानतळ ते महावीर चौक व महावीर चौक ते नगरनाका रस्ता दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) औरंगाबाद शहरातील रा.म.क्र. ७५३ अ वरील चिखलठाणा विमानतळ ते महावीर चौक दरम्यान रु.७.९५ कोटी इतक्या रक्कमेचे नुतनीकरणाचे काम रा.म., सा.बां. विभागामार्फत सन २०१८-१९ मध्ये करण्यात आले आहे.
(२) सन २०१८-१९ मध्ये चिखलठाणा विमानतळ ते महावीर चौक दरम्यान करण्यात आलेल्या कामाचा दोष दायित्व कालावधी (DLP) दि.११.०१.२०२० रोजी संपुष्टात आला आहे.

त्यानंतर केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सदर रस्त्यावरील खड्यांची दुरुस्ती करण्यात येवून सद्यस्थितीत सदर रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.
(३) केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत One time improvement अंतर्गत महावीर चौक ते नगरनाका दरम्यान देखभाल व दुरुस्ती करण्यात येवून सद्यस्थितीत सदर रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या बालवाडीकरिता साहित्याचा पुरवठा न करता ठेकेदाराला देयके अदा केल्याबाबत

**(६७) * २४२०२ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेतील शिक्षण विभागाच्या शाळा बंद असतानाही कोरोनाच्या काळात मध्यवर्ती भांडार विभागाच्यावतीने बालवाडीच्या विद्यार्थ्यांसाठी नीलकमल या प्रख्यात कंपनीच्या एकूण पावणेदोन कोटी रुपयांच्या टेबल-खुर्च्या खरेदी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२१ पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात बालवाडी बंद असल्याने सदर खरेदी केलेले साहित्य ताब्यात घेण्याबाबत महानगरपालिका भंडार विभागाच्यावतीने शिक्षण विभागाला पत्र देण्यात आले होते व सदर साहित्य ताब्यात घेण्यास शिक्षण विभागाच्यावतीने असमर्थता दर्शवली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्षात बालवाड्यांमध्ये साहित्य वाटप झाले नसतानाही संबंधित ठेकेदाराचे देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेच्यावतीने नेहरूनगर मधील गोदामात साहित्य ठेवले असल्याबाबतचे भांडार अधिकारी यांनी सांगितले असता सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी, नागरिक व वृत्तपत्र प्रतिनिधींच्या वतीने प्रत्यक्षात सदर गोदामाची पाहणी केल्यावर नीलकमल या प्रख्यात कंपनीचे किंवा इतर कोणत्याही कंपनीचे साहित्य नेहरूनगर येथील महानगरपालिका भंडार विभागाच्या गोदामात आढळून आले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोरोना काळात फक्त कोरोना संदर्भात आरोग्य व वैद्यकीय साहित्य खरेदी करण्याचे शासकीय आदेश असतानाही व लॉकडाउनच्या काळात राज्यात सर्वत्र सर्व बालवाडी ते पदवीधर पर्यंत सर्व शैक्षणिक संस्था बंद असतानाही बालवाडीसाठी पावणे दोन कोटी रुपयांच्या टेबल-खुर्च्या साहित्याची खरेदी करण्यात आल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार साहित्याचा पुरवठा न करता देयक अदा करण्यात आलेल्या ठेकेदारावर व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१), (२), व (३) • पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अखत्यारीतील बालवाड्या व आंगणवाड्या करिता टेबल व खुर्ची खरेदी करण्यासाठी विहित कार्यपद्धतीनुसार अंदाजे २.३१ कोटी खर्चाची निविदा दिनांक ०१/०८/२०१९ ते दि.२१/०८/२०१९ या कालावधीत प्रसिद्ध करण्यात आली होती.

• तथापि, निविदा कागदपत्रांमध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने सदर निविदा रद्द करुन फेरनिविदा दि.१८/०९/२०१९ ते दि.०३/१०/२०१९ या कालावधीत प्रसिद्ध केली होती. निविदेचा वित्तीय लिफाफा दि. ११/१२/२०१९ रोजी उघडण्यात येऊन लघुत्तम दर असणाऱ्या मे. निलकमल लि. यांना रु. १,८६,००,०००/- या दरामध्ये स्विकृत करण्यात आले असून सदरच्या खर्चास दि.२०/०२/२०२० रोजी स्थायी समितीची मान्यता देण्यात आली.

• दि. २६/०५/२०२० अखेर मे. निलकमल लि. यांनी सदर साहित्याचा पुरवठा केला असून हे साहित्य पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नेहरुनगर येथील गोडाऊन तसेच महानगरपालिकेच्या भोसरी विधानसभा कार्यालयाच्या इमारतीमध्ये सुरक्षित ठेवले आहे, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

• प्राप्त साहित्याची तांत्रिक तपासणी झाल्यानंतर सदर साहित्याचे देयक स्थायी समिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मान्यतेने सदर संस्थेस अदा करण्यात आले होते.

• वरील साहित्य ताब्यात घेण्याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागास दि. ०२/०६/२०२०

व दि. १८/०६/२०२० च्या पत्रान्वये कळविले असता कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे व शाळा बंद असल्याने शाळा सुरु झाल्यानंतर साहित्य ताब्यात घेण्यात येईल असे कळविले आहे.

(४) सदर बाब खरी नाही. असे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) • पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने केलेल्या मागणीनुसार आवश्यक टेबल, खुर्च्या यांच्या खरेदीकरिता शासन खरेदी नियमावलीमधील विहित कार्यपद्धतीचे पालन करुन राज्य शासनाच्या महाटेंडर या पोर्टलवर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.

• सदर साहित्य विहित स्पेसिफिकेशननुसार महानगरपालिकेचे गोडाऊनमध्ये सुरक्षित ठेवणेत आले असून शाळा सुरु झाल्यानंतर सदर साहित्य संबंधित विभागाच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

• त्यामुळे ही खरेदी कोरोना काळात झाली व साहित्याचा पुरवठा न करता मे. निलकमल लि. यांना देयक अदा केले आहे हे वस्तुस्थितीस धरुन नाही, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(६८) * २५५२३ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड)** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागातील अनधिकृत बांधकामावर लाईफ ॲन्ड लाईट या संस्थेने सन २०१६ पासून कारवाई करण्यासंदर्भात सादर केलेल्या २७१६ तक्रारींपैकी २१०७ अनधिकृत बांधकामांना नोटीस देण्यात आली असून त्यापैकी ११८० अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येवून उर्वरित अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासंदर्भात कायदेशीर कारवाई सुरू असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरईटीएमएस या संगणक प्रणालीतील माहितीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सन २०१६ पासून आढळून आलेल्या २७८३१ अनधिकृत बांधकामांपैकी केवळ ७८३७ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली असून उर्वरीत अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासंदर्भात कायदेशीर कारवाई सुरू असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी कायदेशीर कार्यवाही पूर्ण करण्यास महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांचेकडून जाणीवपूर्वक विलंब करण्यात येत असून सदरहू अनधिकृत बांधकामांवर किती कालावधीत निष्कासनाची कारवाई करण्यात येणार आहे तसेच या प्रकरणी कारवाईस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यास हलगर्जीपणा केल्याचे आढळून आल्यास पदनिर्देशित अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील ५६ (अ) अनुसार कारवाई करण्याची तरतूद असताना अनधिकृत बांधकामांना जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर महानगरपालिका सेवा व वर्तणूक नियमावली १९८९ नुसार महानगरपालिकेतर्फे केवळ किरकोळ कारवाई करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अनधिकृत बांधकामांना जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील ५६ (अ) अनुसार कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवरील कारवाईस खालील कारणांमुळे विलंब झाला आहे:-
• माहे एप्रिल, २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयातील बराचसा अधिकारी वर्ग निवडणूकपूर्व कार्यासाठी व्यस्त असल्यामुळे सदरच्या काळात निष्कासन कारवाई प्रभावीपणे होऊ शकली नाही.

• शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी जमिनीवरील अनधिकृत झोपड्या व अन्य बांधकामे पावसाळ्यात न तोडण्याबाबत दिनांक १५ सप्टेंबर, २००१ रोजीच्या शासन निर्णयानुसार, माहे जून २०१९ पासून सुरु होणाऱ्या पावसाळ्यात निष्कासन कारवाई झाली नाही.

• माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयातील बराचसा अधिकारी वर्ग निवडणूकपूर्व कार्यासाठी व्यस्त असल्यामुळे सदरच्या काळात निष्कासन कारवाई प्रभावीपणे होऊ शकली नाही.

• संपूर्ण जगात कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मार्च २०२० पासून मा. उच्च न्यायालयाच्या सुमोटो रिट पिटीशन (एसटी) क्रमांक ९३४३२/२०२० मधील आदेशानुसार, कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर दिनांक ३१ जानेवारी, २०२१ पर्यंत बांधकामांवर निष्कासन कारवाई स्थगित केली होती.

तथापि, दिनांक ३१ जानेवारी, २०२१ नंतर बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर योग्य ती कारवाई सुरु असून, न्यायालयीन कार्यवाही सुरु असलेल्या प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) अनधिकृत बांधकाम निष्कासित प्रकरणी हलगर्जीपणा केल्याचे आढळून आल्यास पदनिर्देशित अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील ५६ (अ) अनुसार कारवाई करण्याची तरतूद आहे.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पदनिर्देशित अधिकाऱ्यांवर ५६(अ) नुसार कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याच्या कामात हलगर्जीपणा केल्याचे आढळून आल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर मनपा सेवा व वर्तणूक नियमावली १९८९ नुसार कारवाई करण्यात येते.

मागील तीन वर्षांमध्ये पदनिदेर्शित अधिकाऱ्याने त्याच्या कामामध्ये निष्काळजीपणा, काम वेळेत न करणे, निष्कासन कारवाईत दिरंगाई करणे, निष्कासन कारवाईच्या संदर्भात इतर कामात चालढकल करणे इत्यादी कारणांसाठी खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

• ६ पदनिर्देशित अधिकारी/प्रभारी पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे.

• २२ पदनिर्देशित अधिकारी/प्रभारी पदनिर्देशित अधिकारी यांची पुढील देय वेतनवाढ एक वर्षाकरिता हंगामी स्वरुपात रोखण्यात आली आहे.

• ३ पदनिर्देशित अधिकाऱ्यांना प्रत्येकी रु. १०००/- व १ पदनिर्देशित अधिकाऱ्यास रु. ५०००/- इतका दंड ठोठावण्यात आला आहे.

• १३ पदनिर्देशित अधिकारी यांची संक्षिप्त चौकशी सुरु आहे.

• सी विभागातील एका अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात कसूर झाल्यामुळे संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त, पदनिर्देशित अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून त्यांची खात्यांतर्गत चौकशी सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंबई येथील जोगेश्वरी पश्चिम द्रुतगती महामार्ग व जोगेश्वरी विक्रोळी जोड रस्ता (बांद्रेकरवाडी) जंक्शन येथे भुयारी मार्ग उभारण्याबाबत

**(६९) * २४६४९ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी पश्चिम द्रुतगती महामार्ग व जोगेश्वरी-विक्रोळी जोड रस्ता (बांद्रेकरवाडी) जंक्शन येथील वाढती वाहतूक कोंडी पाहता या जंक्शनच्या ठिकाणी नवीन भुयारी मार्ग उभारण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास आयुक्त, एमएमआरडीए यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी ट्रामा केअर रुग्णालयासमोर प्रस्तावित असलेला भुयारी मार्ग हा जोगेश्वरी पश्चिम द्रुतगती महामार्ग व जोगेश्वरी-विक्रोळी जोड रस्ता(बांद्रेकरवाडी) जंक्शन येथे उभारून त्यास चार प्रवेशद्वार ठेवल्यास या परिसरातील ट्रामा केअर रुग्णालयात येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक, अस्मिता विद्यालयातील विद्यार्थी, जोगेश्वरी रेल्वे स्थानकाकडे ये-जा करणारे प्रवासी तसेच पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या दुतर्फा असलेल्या प्रतापनगर, शामनगर,

बांद्रेकरवाडी, रामवाडी, फ्रान्सिसवाडी इ. वस्त्यांमधील नागरिक या सर्वांना त्याचा लाभ होणार आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार सदरहू भुयारी मार्गाकरीता आवश्यक तो निधी उपलब्ध करून देवून भुयारी मार्ग उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदरहू भुयारी मार्गाचे काम प्रत्यक्षात केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) • सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जोगेश्वरी येथे पश्चिम द्रुतगती महामार्गावर बांद्रेकर वाडी व प्रताप नगर या दोन्ही बाजूकडील पादचा-यांच्या सोईच्या दृष्टीने पादचारी भुयारी मार्ग प्रस्तावित करण्यात येऊन त्याचे सविस्तर नकाशे तयार करण्यात आले होते.

• सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत माहे मार्च, २०१९ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पश्चिम द्रुतगती महामार्ग कायम स्वरुपी हस्तांतरीत केल्यानंतर मेट्रो लाईन ७ चे काम सुरु करण्यात आले आहे जे की अंतिम टप्प्यात आहे.

• जे.व्ही.एल.आर. जंक्शन येथे आता मेट्रो लाईन -६ चे काम प्रगतीपथावर असून हा मेट्रो मार्ग लोखंडवाला ते जे.व्ही.एल.आर. मार्गे विक्रोळी पर्यत जाणारा असून, प्रस्तावित पादचारी भुयारी मार्गाच्या दिशेने जाणारा आहे.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जे.व्ही.एल.आर. जंक्शन येथे उड्डाणपुलाचे काम सुरु होते. तथापि, जे.व्ही.एल.आर. येथे मेट्रो लाईन ७ व ६ या दोन्ही मेट्रो मार्गाची स्थानके तसेच त्यांची जोडणी नियोजित असल्यामुळे सध्या उड्डाणपुलाचे काम थांबविण्यात आले आहे. तसेच, प्राधिकरणामार्फत नजिकच्या कालावधीमध्ये पश्चिम द्रुतगती महार्गावर एक्सीस कंट्रोल प्रकल्पाची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

• उक्त पार्श्वभूमीवर, मेट्रो रेल्वे कामांची प्राथमिकता तसेच प्राधिकरणामार्फत अन्य कामांचे नियोजन विचारात घेता पश्चिम द्रुतगती महामार्ग व जे. व्ही. एल. आर. जंक्शन येथे पादचारी भुयारी मार्गाचे काम हाती घेण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सद्य:स्थितीत नियोजित नाही.

-----------------

## कोपरगाव-कोल्हार (जि.अहमदनगर) या राज्य महामार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(७०) * २५२१९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव-कोल्हार (जि.अहमदनगर) राज्य महामार्गाची दुरुस्ती न करताच सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. ची कोपरगाव-अहमदनगर टोलवेश ही कंपनी टोलवसूली करत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाकडे वारंवार तक्रारी करुनही त्याची दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम व खड्ड्यांमुळे अनेकदा अपघात होऊन प्राणहानी होत असल्याचे निरीक्षण अहमदनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी नोंदविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार टोलवसूलीस स्थगिती देऊन रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर प्रकल्पाची पथकर वसुली दिनांक १२.१२.२०१९ पासून बंद करण्यात आलेली आहे.

(३) जिल्हाधिकारी कार्यालय, गृह शाखा यांचेकडील प्राप्त अहवालानुसार, रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे व खड्डयांमूळे अपघात होऊन प्राणहानी होत असल्याचे आढळून आलेले नाही.

(४) उद्योजकास वेळोवेळी सूचित करुनही खड्डे दुरुस्ती व नुतनीकरण न केल्याने सदर खर्च उद्योजकाच्या सवलत करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार वसुल करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्पाची पथकर वसुली दिनांक १२.१२.२०१९ पासून बंद करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.